बुधवार, ६ सप्टेंबर २०२३
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ३८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • WEDNESDAY 6 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-38 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

# तरच समाजाला आरक्षण मिळेल : संभाजीराजे

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** मराठा आरक्षणाचे घोंगडे गेले कित्येक वर्षे भिजत पडले आहे. भाजपा-शिवसेनेचे युती सरकार, शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादीचे महाविकास आघाडी सरकार आणि आता शिंदे गट-अजित पवार गट- भाजपा यांचे महायुतीच्या सरकारलाही मराठा आरक्षणाचा तिढा सोडवता आलेला नाही. यावरून बीडचे मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज आठवा दिवस असून सरकारने यावर निर्णय घेतलेला नाही. यावरून स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी भाष्य केले आहे. त्यांनी दिल्लीत आज माध्यमांशी संवाद साधला.

संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, मनोज जरांगे दरवर्षी आंदोलन करतात. त्यांच्या अनेक आंदोलनांना भेट दिली आहे. मराठा समाजाची जी भूमिका असेल तीच माझीही भूमिका असेल. सरकारने समिती स्थापन केली आहे, या समितीला नेहमी सुचित करत आलो आहे की जर तुम्हाला आरक्षण मिळवायचे असेल तर त्याचे विविध पॅरामिटर्स आहेत. आणि ते कशापद्धतीने सोडवता येतील यावर विचार केला पाहिजे. ते अद्यापही सुटलेले नाहीत असे माझे मत आहे. सर्वोच्च न्यायालयाने मराठा समाज सामाजिक मागास नाही असे सिद्ध केले आहे. सामाजिक मागास असल्याशिवाय तुम्हाला आरक्षणच मिळणार नाही. मराठा समाज हा पुढारलेला वर्ग आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

# चुकीच्या लोकांकडे देशाचे नेतृत्व

## शरद पवार : मोदींकडून फक्त फोडाफोडीचे राजकारण

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव : मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब जळगाव येथील स्वाभिमानी सभेत बोलताना म्हणाले की, राज्यात यावर्षी मागील वर्षाच्या तुलनात पाऊस कमी झाला असल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट आले आहे. शेतकरी अडचणीत आहे या अडचणी मधून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याचे काम राज्यकर्त्यांचे आहे मात्र असं होताना दिसत नाही आहे यावर्षी कमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे या शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम राज्य सरकारने करावे असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांनी जळगाव येथील स्वाभिमानी सभेत बोलताना म्हटले आहे.**



शरद पवार म्हणाले आज ज्या भाजप वाल्यांच्या हातात देशाची आणि राज्याची सूत्रे आहेत. त्यांना शेतकऱ्यांच्या दुःखाबद्दल यत्किंचितही आस्था नाही. दुष्काळग्रस्तांबद्दल प्रेम नाही, धरणाधरणावर पाणी नाही त्याची चिंता नाही. ठिकठिकाणी टॅंकरने प्यायची अवस्था झाली त्याची काळजी नाही. याचा अर्थच चुकीच्या लोकांच्या हातात सत्ता गेली आहे. महाराष्ट्र असो किंवा इतर राज्य असो बेकायदेशीररित्या सर्वसामान्य लोकांवर अन्याय केला जात आहे असेही शरद पवार म्हणाले.

पुढे बोलताना पवार म्हटले की, या वर्षी हवा तेवढा पाऊस पडला नाही. पाऊस नसल्याने राज्याची स्थिती चिंताजनक अनेक ठिकाणी दुबार पेरणीची परिस्थिती असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. विमा कंपन्याच्या माध्यमातून एक रुपयात पीक विमा देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. त्यामुळे आशा निर्माण झाली होती. मात्र आता शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचा आरोप शरद पवार यांनी केला आहे. ही परिस्थिती केवळ जळगाव जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाड्यासह अनेक ठिकाणी हीच स्थिती असल्याचे शरद पवार म्हणाले. विमा कंपन्यांमुळे शेतकरी संकटात सापडला असून त्याकडे सरकारने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे शरद पवार साहेब यांनी म्हटले आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हवी तशी आवश्यक बाजारपेठ उपलब्ध नसल्याचे शरद पवार म्हणाले. शेजारच्या यवतमाळ जिल्ह्यात पंधरा दिवसांत २० लोकांनी आत्महत्या केली.



दुष्काळी पुरंदरच्या मल्हारसागर धरणावर विदेशी फ्लेमिंगो पक्ष्यांचे आगमन झाले आहे. सध्या पुरंदर तालुक्याच्या जेजुरी कऱ्हा नदीवरील मल्हारसागर धरणावर पाणीसाठा अल्प प्रमाणावर असताना देखील युरोप खंडातून लाखो मैलाचा प्रवास करीत फ्लेमिंगो पक्षी दाखल झाले असून चित्रबल्क स्पिन बुल ग्रेहौन पक्षीही दिसू लागले आहेत. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# आदित्य एल-१ ची मोठी झेप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सूर्याचा अभ्यास करण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्त्रो'चं आदित्य एल-१ हे अवकाशयान गेल्या आठवड्यात (२ सप्टेंबर) आकाशात झेपावले. सूर्याच्या सर्वात वरील आवरणाचा, म्हणजेच सूर्य प्रभामंडळाचा (करोना) अभ्यास करण्यासाठी या यानामध्ये सात वेगवेगळी उपकरणे बसवण्यात आली आहेत. सौरवादळांचा पृथ्वीच्या वातावरणावर होणारा परिणाम, सूर्याचे तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम, ओझोनचा थर आणि अंतराळातील हवामान या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी इस्त्रोने ही मोहीम हाती घेतली आहे. दरम्यान, आदित्य एल-१ या अवकाशयानाने नुकताच एक महत्त्वाचा टप्पा ओलांडला आहे. इस्त्रोने याबाबतची माहिती शेअर केली आहे. लाँचिंगनंतर चार दिवसांनी म्हणजेच आज (५ सप्टेंबर) सकाळी इस्त्रोने एक ट्वीट करून सांगितलं की, आदित्य एल-१ ने दुसऱ्यांदा यशस्वीपणे त्याची कक्षा (ऑर्बिट) बदलली आहे. आदित्य एल-१ ची कक्षा बदलण्याच्या ऑपरेशनदरम्यान बंगळुरू आणि पोर्ट ब्लेअरमधून उपग्रहांद्वारे इस्त्रोच्या या अवकाशयानाचा मागोवा घेण्यात आला. आदित्य एल-१ हे अवकाशयान आधी २४५ किमी X २२४५९ किमी कक्षेतून जात होते. या यानाने आता त्याची कक्षा बदलून ते २८२ किमी X ४०२२५ किमी या कक्षेतून पुढे सरसावत आहे.

# मी समाजाला शब्द दिलाय, माझी अंतयात्रा तरी निघेल नाहीतर..

## मनोज जरांगे पाटील उपोषणावर ठाम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** राज्य सरकारचे शिष्ठमंडळ मंगळवारी अंतरवली सराटी गावात उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी पोहोचले. ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, शिवसेना नेते संदिपान भुमरे, अर्जुन खोतकर यांचा या शिष्टमंडळात समावेश आहे. गिरीश महाजन यांनी मनोज जरांगे यांना मराठा आरक्षणासाठी सरकारने काय-काय पावले उचलली याबाबत माहिती दिली. मराठा आरक्षणाचे काम 100 टक्के होईल, असे गिरीश महाजन यांनी सांगितले. एकदा जीआर काढून हा प्रश्न सुटणार नाही. समितीशिवाय आपलं काम होणार नाही, असे गिरीश महाजन यांनी सांगितले. त्यावर मनोज जरांगे यांनी तुम्ही म्हणजे सरकार नाही, असे स्पष्ट सांगितले. मराठा आरक्षणासंदर्भात सरकार सकारात्मक आहे. आंदोलन एवढे ताणून चालत नाही, असे गिरीश महाजन यावेळी म्हणाले. तसेच लाठीचार्ज करण्याचा आदेश देणाऱ्या मुख्य पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई केली आहे, असे गिरीश महाजन यांनी सांगितले. सरकारच्या शिष्टमंडळाकडून मनोज जरांगे यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. यावेळी गिरीश महाजन यांनी थोडा वेळ लागेल, असे सांगितले.आम्ही ओबीसींच्या यादीत 83 व्या क्रमांकावर आहोत, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ते विनंती घेऊन आले आहेत. तुम्ही वेळ दिला पाहिजे, असे अर्जुन खोतकर म्हणाले.जर 83 व्या क्रमांकावर मराठा आहेत. मग याला चॅलेंज द्यायचे कामच नाही. मंगल समितीने विषय पटलावर ठेवला आहे. तुम्हाला सर्वे करायला मतदान करायचे आहे का? तुमच्याकडे समिती आहे. आम्ही कुणबीच आहोत. आमचा मूळ व्यावसाय शेती आहे.




**सरकारला 3 महिने वेळ दिला** : आम्ही सरकारला 3 महिने वेळ दिला. गोर गरिबांचे पोरांचे पाप माझ्या डोक्यावर सोडू नका. आम्हाला 70 वर्षांपासून आरक्षण असून मिळालेले नाही. माझ्यावर दबाव आणू नका, असे मनोज जरांगे म्हणाले. यावेळी गिरीश महाजन यांनी वारंवार वेळ वाढवून देण्याची विनंती केली.

**मी समाजाला शब्द दिलाय, माझी अंतयात्रा तरी निघेल नाहीतर** : मी मराठा समाजाला शब्द दिलेला आहे. आता शेवटचे माझी अंतयात्रा तरी निघेल नाहीतर मराठा आरक्षणाची विजययात्रा निघेल. काळाने जगलो तुमचा, मेलो तर समाजाचा. त्यामुळे मी असा मेलेलो परवडेल, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

अहो असे आंदोलन करुन चालत नाही, असे गिरीश महाजन म्हणाले. त्यावर मी 4 फेब्रुवारीपासून लढतोय, असं जरांगे पाटील म्हणाले. मरण्याची भाषा करायची नाही, असे राजेश टोपे म्हणाले. अहो, मरायची भाषा करत नाही, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाला आणखी 4 दिवसांचा वेळ देतो, असे आश्वासन दिले.



## उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या हुशार आणि चुणचुणीत मुलांचे डॉ राव यांनी अतिशय कौतुक केले. त्यामुळे राजेश आणि पिंकी खूपच आनंद झाला. घरी गेल्यावर राजेश आणि पिंकीने चंद्रयान मोहिमेची आणि इस्त्रोची माहिती एका वहीत सचित्र लिहून डॉ. राव यांना दाखवण्याचे ठरवले. श्यामराव, श्यामलाताई, पिंकी आणि राजेश हे एक आदर्श कुटुंब होते. सतत नवनवीन गोष्टी शिकणे, निसर्गाचा आनंद घेणे याकडे त्यांचा नेहमी ओढा असे. गावातील लोक श्यामराव आणि श्यामलाताईंना एक आदर्श आईवडील म्हणून ओळखत असत तर पिंकी आणि राजेश यांची प्रसिद्धी आदर्श आणि आज्ञाधारक मुले म्हणून होती. गावातीलच रोटरी क्लबच्या वतीने श्यामराव आणि श्यामलाताईंचा आदर्श पालक म्हणून सत्कार करण्यात आला होता. त्याप्रसंगी बोलताना श्यामराव म्हणाले, ' आपण आज आमचा आदर्श पालक म्हणून सन्मान केला आहे त्याबद्दल आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करतो. मित्रांनो, आईवडील होणे सोपे असते पण आदर्श पालक होणे ही कठीण गोष्ट आहे. मुलांना घडवायचं असेल तर त्याची सुरुवात स्वतःपासूनच होते असं मी मानतो. आमची मुलं पिंकी आणि राजेश यांना आम्ही ते एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहेत याची जाणीव ठेवून वाढवतो. त्यांना ज्या गोष्टींची आवड आहे, त्या करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य देतो पण त्याचबरोबर त्यातील फायदेतोटे त्यांना समजावून सांगतो. महत्वाचे म्हणजे आम्ही कधीच त्यांना हे कर किंवा हे करू नकोस असा कोरडा उपदेश कधीच करत नाही." त्यांनी वाचन करावे असे आम्हाला वाटत असेल तर आम्ही दोघेही स्वतः त्यांच्यासमोर वाचन करताना त्यांना दिसतो. ते पाहून त्यांना वाटतं की आपले आईबाबा किती वाचन करतात, तसं आपणही करावं. मग ते स्वतः होऊनच पुस्तक घेऊन बसतात. त्यासाठी आम्ही स्वतःच टीव्हीवरील कौटुंबिक मालिका पाहणे बंद केले आहे शिवाय मोबाईलचा वापर आम्ही आवश्यक तेवढाच करतो. त्यामुळे मोबाईलचे आकर्षण त्यांनाही विशेष नाही. त्यांना वेगवेगळ्या गोष्टींची, ठिकाणांची माहिती व्हावी म्हणून आम्ही स्वतःच वेळ काढून त्यांना अनेक ठिकाणी सहलीसाठी घेऊन जातो. तेथील माहिती त्यांना देतो. गावात व्याख्यानं असतील तर त्या ठिकाणी त्यांना घेऊन जातो. आता मुलांनाही नवनवीन गोष्टी शिकण्याची, समजून घेण्याची आवड निर्माण झाली आहे. मुलं आपल्या अनुकरणातून, वागण्याबोलण्यातून अनेक गोष्टी आपोआप शिकतात. नुसतं सांगून उपयोग नसतो. '



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

### अविचारांचे विकार उद्भवू नयेत

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

भीती, राग, द्वेष, मत्सर, आनंद इत्यादी भावनांमुळे शरीरात व्याधी उत्पन्न होतात. त्यामुळे कोणत्याही भावनेचा अतिरेक टाळण्यासाठी यथार्थ ज्ञान होणं महत्त्वाचं असतं. त्यासाठी वृत्तीवर नियंत्रण ठेवणं, योग करणं आवश्यक असतं. योगविद्या ही शरीर, मन यांना सतत क्रियाप्रवण, उत्साही, निरामय ठेवण्यासाठी निरंतन उपयोगी पडणारी विद्या आहे. मानसिक, शारीरिक स्वास्थ्यासाठी, साधी व्याधी बरबादी ठरू न देणं आपल्याच हाती असतं. योगाभ्यासाच्या मदतीनं आपल्या शारीरिक आणि मानसिक समस्यांची खात्रीने सोडवणूक होऊ शकते. अनेक विद्यार्थी शारीरिक व्याधी दूर करण्याच्या उद्देशाने तसेच स्वास्थ्य टिकवण्याच्या दृष्टीने योग शिक्षण घेतात. काही विकार उद्‌भवू नये म्हणून कुतूहलपूर्णता व कुतूहलजागृती म्हणूनही काही जण योगाभ्यासाकडे वळतात. आपली दैनंदिन धावपळ, धडपड ही सर्व पुर्वानुभवांवरच चाललेली असते. ह्या सर्वांमधून मुक्त व्हायचं असेल, तर चित्तावरचे संस्कार शून्यवत करत आणणे जरुरीचं असतं. ही कैवल्य अवस्था किंवा निर्बीज समाधीची अवस्था आहे. कारण यात प्रतिक्रिया शून्य होत जाते. 'मी' चं परमात्मा वेगळेपण संपतं आणि मनही शांत होत जातं. आपल्या वृत्तीमुळेच मन चंचल असतं. वृत्ती शांत झाल्या, की मन हे शांत होतंच. मन स्वतःच्या ठिकाणी स्थिर राहतं. ते इतर कोठेही न जाणे म्हणजे मनःस्वास्थ्य प्राप्त करणे होय. हे मनःस्वास्थ्य आपल्याला योगाच्या अभ्यासातून मिळतं. मुलभूत गरजांपैकी वस्त्र आणि निवारा ह्या दोन्ही गरजा महत्वाच्या असतातच पण त्याहीपेक्षा अधिक महत्वाची गरज म्हणजे अन्न होय. त्या अन्नाशिवाय कोणताही जीव जगूच शकत नाही. त्याची गरज शारीरिक स्वास्थ्यासाठी अधिक असते, आपल्या जगण्यासाठी असते.



आधुनिक केसरी

### नामाचे भजन | श्वास करी ||

विठोबाचे माझ्या | करा रे स्मरण ||
न हो विस्मरण | क्षणभरी ||१||
ध्यास ज्ञानाईचा | लागो मज नित्य ||
तुकोबाची सत्य | वाणी कळो ||२||
पायाने चालावी | वाट ती पंढरी ||
अभंग अंतरी | रूजवावा ||३||
टाळ व्हावा भाव | वीणा व्हावी वाणी ||
भक्तीच्या रिंगणी | मग्न व्हावे ||४||
मनाच्या गाभारी | नसावा विकार ||
सात्विक आचार | आचरावा ||५||
ध्यानी मनी स्वप्नी | हरिचे चिंतन ||
नामाचे भजन | श्वास करी||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

दुर्गमं सुगमं कृत्वा सहजं कुरु जीवनम्|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्||८३|| दुर्गमाला सुगम करून माझे जीवन सहज कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ब्रह्मविद्या के बोध बिनु, जप तप पूजा पाठ ।
यज्ञ दान व्रत नियम जो, यह सब उकठा काठ
।।३७।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/३७

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ब्रह्मविद्या विवेक रहित जप-तप, पूजा-पाठ, यज्ञ-दान आणि व्रत-नियम हे सर्व मुळापासून उखडलेल्या वृक्षाच्या लाकडाप्रमाणे आहेत. उखडलेल्या शुष्क वृक्षात रस, जीवन असत नाही, तद्वतच ज्ञानहीन सर्व कर्म शुष्क आणि निर्जीव आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सिध्दलक्षण

आधुनिक केसरी





सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण फक्त कल्पना करू शकतो जर अमृत प्यायल्यावर शरीराची अंगकांती बदलते,तसेच आत्मसाक्षात्कार झाल्यावर बाह्य स्थिति अंगी बाणली तर आत्मज्ञान प्राप्त होते.
आत्मस्वरूप स्वतः सिध्द आहे ही गोष्ट वेदांमध्ये प्रसिद्ध आहे. जे दिसते त्यालाच खरे मानावे. दिवसरात्र आत्मस्वरूपाचे ध्यान व चिंतन केल्याने मन त्या स्वरूपाने आतबाहेर भरून जाते.अत्यंत सूक्ष्म आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात सदैव गुंतलेले मन आपोआपच अत्यंत सूक्ष्म बनते.कालांतराने त्यात आमूलाग्र बदल घडून ते उन्मन होते. उन्मनी अवस्था जेव्हा साधकांची अवस्था उन्मनी होते तिथे "मी तू पणाची बोलवण होते" संपूर्ण स्थिती किंवा मन हे परमात्म्याच्या चरणीं लागते.

## शुद्ध भावनेशिवाय सर्व व्यर्थ

आधुनिक केसरी

भगवंताला शरण जाण्यात देहबुद्धी आणि अभिमान आड येतो, परिस्थिती आड येत नाही. ती व्यसनाच्या आड कुठे येते ? अभिमान जाण्यासाठी उपाय म्हणजे, जे जे कराल ते ते भगवंताला अर्पण करावे. तोच कर्ता, आपण काहीच करीत नाही, अशी भावना ठेवावी; म्हणजे अभिमानही भगवंताला अर्पण करावा. आपण भगवंताशी काही ना काही कारणाने संबंध ठेवावा. त्याच्याशी बोलावे; त्याचे नाम घ्यावे. नामासारखे दुसरे खरे साधन नाही. वासरू घेऊन गेले म्हणजे जशी गाय पाठीमागून आपोआप येते, त्याप्रमाणे नाम घेतले की भगवंत त्यामागे येतो. ज्याला एकदा नामाची गोडी लागली त्याला प्रपंचाची भीती वाटू लागते. विषय त्याला कडू वाटू लागतात. परमात्म्याच्या नामाने संसार बिघडतो हे म्हणणे चुकीचे आहे. नाम घ्यायचे म्हणून कर्ममार्ग सोडू नये. नामाची गोडी ज्याला आली त्याचीच कर्मे सुटतात. नामाचा अनुभव नाही असे म्हणणे खोटे आहे; आपण ते जितके घ्यावे तितके घेतच नाही. नामात प्रेम येईल असे करावे. जन्माला आल्यासारखे नामाचे होऊन राहावे. भगवंत आपल्या नामस्मरणात आहे. शुद्ध भावनेशिवाय सर्व व्यर्थ आहे; आणि भाव शुद्ध होण्यासाठी सत्समागमावाचून दुसरा उपाय नाही. एकदा त्याचे होऊन राहिले म्हणजे तोच सर्व उपाय काढतो. 'मी' अमुक एक साधन करीन, असे म्हणू नये. 'परमेश्वरा, तूच माझ्या हातून करवून घेणारा आहेस,' अशी दृढ भावना ठेवावी. समजा, आपण एक व्यापार केला, त्यासाठी एकाने आपल्याला भांडवल दिले, तर त्या माणसाला आपण कधीही विसरत नाही; त्याचप्रमाणे ज्या भगवंताने आपल्याला विद्या, पैसा, प्रकृती दिली, त्याला आपण कधीही विसरू नये. भगवंत हा सहजसाध्य आहे, सुलभसाध्य नाही. निसर्गाने जे आपल्याकडे येते ते 'सहज' होय. म्हणून, सहजसाध्य याचा अर्थ, फलाची अपेक्षा नसणे आणि कर्तव्याचा अभिमान नसणे हा समजावा. भगवंताने आपल्याला ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधान मानून त्याचा विसर पडू न द्यावा. जो स्वतःपासून दूर आहे त्याला भगवंत दूर आहे. आपण मनुष्यजन्माला आलो हीच आपण भगवंताचे होण्याची खूण आहे. भोग आणि दुःख यात वेळ न घालविता, भगवंताकडे लक्ष दिले पाहीजे. याच जन्मात सुविचाराने आणि सद्‌बुद्धीने भगवंत आपलासा करणे, हेच आपले खरे कर्तव्य आहे. याकरिताच सतत त्याचे ध्यान करावे, आणि मनातून आपले भगवंताशी नाते जोडून ठेवावे, यासारखा दुसरा सुलभ उपाय नाही.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

ते कोठे हि असले तरी ते आपली शक्ती ,प्रेरणा,शिष्यात घालून त्याला साधनेत पुढे नेतात .ते सर्व शक्तिमान असल्याने शिष्य कोठेही असला तरी सद्‌गुरु कृपा शक्तीचा प्रवाह त्याच्या पर्यंत पोह्चतोच व देह बुद्धी क्षीण करतो . आपल्या साधनेत झपाट्याने वाढ झाल्यास आपणास ती सहन होणार नाही. म्हणून होईल तेवढेच गुरू करून घेतात. त्यात समाधान मानावे. येथे एक कटू सत्य मात्र लक्षात ठेवावे कि परमेश्वर रागावला तर गुरु वाचवू शकतात, परंतु गुरु कोपले तर मात्र कोणीही वाचवू शकत नाही तेव्हा गुरुंचा ध्यास सतत असावा व त्यांना मानस पूजेने प्रसन्न करण्याच्या प्रयत्नात असावे. श्री गुरुंचे स्वागत (मानस पूजेने) सर्वच पूजे मध्ये मानस पूजा श्रेष्ठ असल्याने मानस पूजेमध्ये खालील भाव मनात आणून त्यांचे पूजन करावे याला कुठलाही खर्च नाही. आज श्री गुरु माझ्या घरी आले आहेत .पाई खडावा ,हातात दंड,आणि चेहऱ्यावर बाल सूर्याचे तेज असलेले माझे गुरुवर्य आज माझ्या घरी आले आहेत.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अन्नदानं परं दानं विद्यादानमतः परम् ।
अनेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं च विद्यया ||

सरलार्थ – अन्नदान हे श्रेष्ठ तर खरेच; पण विद्यादान हे त्याहून श्रेष्ठ आहे. कारण अन्नाने जी तृप्ती होते, ती तात्कालिक असते. विद्येने मिळणारी तृप्ती यावज्जीव उपभोगता येते.

स्पष्टीकरण - भुकेल्याला अन्नदान करणे हे गृहस्थाचे मुख्य कर्तव्य होय. तो त्याचा धर्मच असतो. कारण भूक हे जिवंत मरण असते. पण एकदा अन्न मिळाले म्हणून कायमची भूक भागत नाही. ते दुपार-संध्याकाळ मिळत राहावे लागते. ज्ञानाचे तसे नाही. एखाद्याला जर आपण विद्या दिली, तर ती त्याला कायमची उपयोगी पडते. म्हणून ज्ञानदान है सर्वश्रेष्ठ दान होय !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ६ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# हंसराज अहीर यांच्या पुढाकारात महाजनसंपर्क अंतर्गत 'घर चलो' अभियानास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भाजपाच्या महाजनसंपर्क अभियानाअंतर्गत दि. 3 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष, पूर्व गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या नेतृत्व व पुढाकारात गोंडपिपरी तालुक्यातील अनेक गांवामध्ये घर चलो अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रत्येक गांवातील नागरीकांचा या अभियानास उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.या अभियानामध्ये माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे विस्तारक खुशाल बोंडे, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, गोडपिपरी भाजपा तालुकाध्यक्ष बबन निकोडे, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजू घरोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या महाजनसंपर्क अभियानात भाजप नेत्यांनी धानापूर, चेकघडोली, भनारहेटी, विठ्ठल वाडा व भंगाराम तळोधी येथे पाऊस सुरू असतांना नागरीकांच्या भरगच्च उपस्थितीमध्ये कार्यक्रमाच्या माध्यमातून संपर्क साधत लोकांशी संवाद साधला. याप्रसंगी उपस्थित लोकांना विविध योजनांची पत्रके वितरीत केली. हंसराज अहीर यांनी केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती देत या योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना होत असल्याचे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सबका साथ, सबका विकास या धोरणाचा अंगीकार करून करोडो लोकांना शेकडो योजनांचा लाभ मिळवून दिला ज्यात घरकूल, शौचालय, उज्ज्वला गॅस, शेतकऱ्यांना सन्मान योजनेचा लाभ व अनेक योजनेच्या माध्यमातून लोकांच्या जिवनात प्रगती घडवून आणली. देशाला जागतिक स्तरावर किर्तीमान मिळवून दिला.

मोदींजीच्या नेतृत्वात देश सुरक्षीत राहणार असल्याने त्यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपाला बळ देण्यास पुढे यावे असे आवाहन केले. या वेळी संजय धोटे व अन्य मान्यवरांनी उपस्थितांना घर चलो अभियानाबाबत मार्गदर्शन केले. धानापूर येथील आयुर्वेदिक रुग्णालय व समाज भवनांचे उद्घाटन हंसराज अहीर यांच्या शुभहस्ते पार पडले या अभियानात माजी नगराध्यक्ष संजय झाडे, माजी जि.प. सदस्य स्वाती वडपल्लीवार, अमर बोडलावार, मनिष वासमवार, कृउबा इंद्रपाल धुडसे, स्वप्निल अनमूलवार, संजय वडस्कर, समिर निमगडे, चंद्रजित गव्हारे, प्रविण धोडरे, संदिप पौरकर, राकेश पून, सुरेखाताई श्रीकोंडावार, भानेश येग्गेवार, सुनिताताई येग्गेवार, गणेश डहाळे, साईनाथ मास्टे, चौधरी सर, धानापूरच्या सरपंचा योगीता वडस्कर, चेक घडोलीचे सरपंच अण्णा उलेंदला, भनारहेटीचे सरपंच भोयर ताई, कल्पनाताई अवथरे, भंगाराम तळोधीचे सरपंच, उपसरपंच, समिर निमगडे यांचेसह अनेक प्रमुख पदाधिकारी सहभागी झाले होते.




# महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

## २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बंगालच्या उपसागरात येत्या २४ तासात कमी दाबाचा पट्टा तयार होऊ शकतो, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्यासंदर्भात सकारात्मक संकेत मिळाले आहे. पश्चिम व उत्तर भागात वाऱ्यांची चक्रकार स्थिती असल्यामुळे पुढील काही तासात कमी दाबाचा पट्टा तयार होऊ शकतो.

हवामान खात्याच्या अंदाजनुसार आठ सप्टेंबरपर्यंत राज्यात हलक्या पावसाचा अंदाज जारी केला होता. तसेच मागील तीन ते चार दिवसापासून घाट माथ्यावर मध्यम ते हलका पाऊस पडत आहे. आता हवामान खात्यानुसार सात सप्टेंबर पर्यंत राज्यातील विविध ठिकाणी पाऊस होईल तसेच मध्य महाराष्ट्रात २४ तासानंतर पावसाचा जोर वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्रात येत्या दोन, तीन दिवसांत पावसाचा जोर वाढणार आहे. राज्यात सहा आणि सात सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस होईल. विदर्भातील काही भाग, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील काही भागात चांगला पाऊस होणार आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. यामुळे मान्सून वारे सक्रीय होणार आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात यामुळे आता चांगला पाऊस होणार आहे.



**पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यात दुष्काळ :** पुणे जिल्ह्यातील चार तालुके दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे . राज्यातील 27 तालुक्यांमध्ये 1 जून ते 1 सप्टेंबरपर्यंत 25 ते 50 टक्के कमी पाऊस झालेला आहे . पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, पुरंदर आणि हवेली या चार तालुक्यांमध्ये कमी पाऊस झाला आहे तर बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर आदी तालुक्यांत अद्यापही पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे . यामुळे या भागात दुष्काळसद्दश्य परिस्थिती निर्माण होणार आहे . याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांचे जिल्हाधिकारी डॉ . राजेश देशमुख यांना पत्र लिहिले आहे .

# यवतमाळ बंदला हिंसक वळण; जमावाकडून दुकानांवर दगडफेक

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे संवैधानिकरित्या आंदोलन करीत असलेल्या मराठा आंदोलकांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. या घटनेस राज्याचे गृहमंत्री जबाबदार असल्याचा आरोप करीत शासन व पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ यवतमाळ येथे आज, मंगळवारी सकाळपासून मराठा-कुणबी मोर्चाने बंद पुकारला आहे. या बंदला काही ठिकाणी हिंसक वळण लागले. आंदोलकांनी एका दुकानावर दगडफेक केली, तर विविध चौकांत टायर जाळून निषेध नोंदवण्यात आला.

शहरात सकाळी १० नंतर बंदची तीव्रता वाढली. आंदोलकांनी शहरात फिरून व्यापाऱ्यांना दुकाने बंद करण्याचे आवाहन केले. यावेळी पोस्टल ग्राउंड परिसरातील हल्दीरामच्या दुकानावर दगडफेक करण्यात आली. यामुळे खळबळ उडाली. या घटनेत दुकानाच्या दर्शनी भागातील काचा फुटल्या. पोलिसांनी घटनास्थळी पोलीस बंदोबस्त लावला. यासोबतच शहरातील विविध चौकांत टायर पेटवून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

शहरातील नागपूर-तुळजापूर महामार्गावर वनवासी मारोती चौकात चक्काजाम आंदोलन करून टायर जाळण्यात आले. आग विझविण्यासाठी अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले होते. या घटनेने शहरात येणारी वाहतूक विस्कळीत झाली. शहरातील अत्यावश्यक सेवा वगळता अन्य व्यापारपेठ सध्या बंद आहे. बंदच्या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाने अनेक मार्गांवरील बसफेऱ्या रद्द केल्याने प्रवाशांचे हाल होत आहे. बंददरम्यान कुठेही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलिसांनी सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला असून अनेक वरीष्ठ पोलीस अधिकारी रस्त्यावर उतरले आहेत.



**वाशिम, मंगरूळपीर शहरात कडकडीत बंद,**
जालना जिल्ह्यातील अंतरावली सराटी ( ता . अंबड ) येथील मराठा आंदोलकांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ आज सकल मराठा समाज व सर्वधर्मिय समाज बांधवांच्यावतीने वाशिम व मंगरूळपीर शहरात कडकडीत बंद पाळला जात आहे . वाशिम शहरात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची प्रतीकात्मक प्रेतयात्रा काढून मुखाग्नी देऊन श्रध्दांजली वाहण्यात आली . यावेळी राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली .
अंतरावली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी संवैधानिकरित्या आंदोलन सुरू असताना, पोलीस प्रशासनाकडून आंदोलकांवर अमानुषपणे लाठीचार्ज करण्यात आला . याचे तीव्र पडसाद गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यात उमटत आहेत . आज वाशीम व मंगरूळपीर शहर बंदचे आवाहन करण्यात आले आहे . त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे .
अत्यावश्यक सेवेची दुकाने वगळता उर्वरित संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्यात आली आहे . बंदमुळे वाशीम व मंगरूळपीर शहरात शुकशुकाट पहायला मिळत आहे . बंददरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे .

# साताऱ्याकडे निघालेला मराठा मोर्चा अडवला

आधुनिक केसरी न्यूज


**वाई :** जालना येथे मराठा आंदोलकांवर करण्यात आलेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ सातारा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी आज मंगळवारी सकाळी वाईहुन साताऱ्याकडे शेकडो कार्यकर्त्यांचा पायी निघालेला मोर्चा पुणे बंगळूर महामार्गावर पाचवड येथे प्रशासनाकडून अडविण्यात आला. यामुळे मोर्चेकरी कार्यकर्ते आक्रमक झाले होते. तेथे शासनाला निवेदन देऊन मोर्चा स्थगित करण्यात आला.

मराठा क्रांती मोर्चा संघटनेचा वाई ते सातारा पायी मोर्चा काढण्यात आला होता. रायरेश्वर वरून आलेल्या क्रांती ज्योतीचे स्वागत करून श्री महागणपती व श्री छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. श्री महागणपतीची आरती करून गणपती घाटावरून सातारा कडे मोर्चास प्रारंभ झाला. वाई ते सातारा पायी मोर्चेचा मार्ग गणपती घाट बावधन ओढा कडेगाव पाचवड उडतारे लिंबफाटा वाढे सदरबाजार जिल्हाधिकार्यालय असा आहे. या मार्गावरील सर्व गावातील मराठा बांधवानी सहभागी होऊन लाखोंच्या संख्यानी हजर राहावे असे आवाहन करण्यात आले होते. या मोर्चासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण भालचिम यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, सहायक पोलिस निरीक्षक रमेश गर्जे, उपनिरीक्षक कृष्णकांत पवार,सुधीर वाळुंज,बिपीन चव्हाण आदी अनेक अधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांचा समावेश असलेला बंदोबस्त तैनात करण्यात आलेला होता. या मोर्चात सर्व समाजाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मराठा समाजाचा वाई ते सातारा निघालेला मोर्चा पोलिसांनी पुणे बंगळूर महामार्गावर पाचवड येथे अडवला,यामुळे मोर्चेकरी जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारण्यासाठी आक्रमक झाले होते. मात्र पाचवड ( ता वाई ) येथे अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे व अप्पर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांनी समन्वयकांशी चर्चा केली. तेथे शासनाला युवक युवतींच्या हस्ते निवेदन देऊन मोर्चा स्थगित करण्यात आला.

# मोदी सरकारचा मास्टर प्लॅन

आधुनिक केसरी

भाजप आणि विशेषत: नरेंद्र मोदी यांना रोखण्यासाठी आणि आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशभरातील विरोधक एकत्र आले आहेत. देशातील प्रमुख विरोधी पक्षांनी एकत्र येत आघाडी स्थापन केली. या आघाडीला नाव दिले 'इंडिया'. आमची युती सर्व समावेशक आहे, असे इंडियाकडून सांगितले जाते. 'इंडिया' या शब्दातून विरोधकांची ही आघाडी बरंच काही सुचवू पाहहे आहे. मात्र विरोधकांच्या याच  प्रयत्नांना उधळून लावण्यासाठी मोदी सरकारने हालचाली सुरु केल्या आहेत. देशाच्या राज्यघटनेत मोठा बदल करण्याच्या तयारीत मोदी सरकार आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले आहे. येत्या 18 सप्टेंबरपासून 22 सप्टेंबरपर्यंत हे विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं आहे. यात विविध विधेयकं मांडली जाणार आहेत. यात राज्यघटनेत मोठा बदल करण्याचा प्रस्ताव मांडला जाणार असल्याची माहिती आहे. देशाच्या राज्यघटनेतील 'इंडिया' हा शब्द हटवला जाण्याची शक्यता आहे. संसदेच्या विशेष अधिवेशनात हा प्रस्ताव मांडला जाण्याची शक्यता आहे. येत्या 18 सप्टेंबरपासून संसदेचं विशेष अधिवेशन सुरु होणार आहे. अशात या अधिवेशनाची जोरदार चर्चा रंगली आहे. कारण लोकसभा निवडणूक तोंडावर असताना मोदी सरकारने तातडीने संसदेचे अधिवेशन बोलावले आहे. त्यामुळे या अधिवेशन काळात कोणकोणती विधेयके मांडली जाणार, याची सध्या जोरदार चर्चा रंगली आहे. मोदी सरकार काही मोठी विधेयके आणणार असल्याची चर्चा आहे. विरोधकांना शह देण्यासाठी मोदी सरकारकडून हालचाली सुरू झालेल्या आहेत. 2024 ची निवडणूक देशाच्या दृष्टीने महत्वाची आहे. अशात ही निवडणूक जिंकण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक प्रयत्न करताना दिसत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मोदी सरकार मोठ्या निर्णयाच्या तयारीत आहे. याच विशेष अधिवेशनाच्या काळात देशातील निवडणुकीतही मोठे बदल होण्याची शक्यता आहे. 'एक देश, एक निवडणूक' हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. तसेच याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी मोदी सरकार कसोसीचे प्रयत्नही करण्याची शक्यता आहे. आगामी निवडणुकीत काँग्रेससह मित्रपक्षांच्या आघाडीला विजयापासून रोखण्यासाठी केंद्र सरकार मोठ्या निर्णयाच्या तयारीत असल्याचे दिसते आहे.



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

# बायकोला सांभाळायला सक्षम, आईलाच का नको ?

आधुनिक केसरी

**वर्तमान सामाजिक जीवनात जन्मदात्याचा सांभाळ करण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असुन ज्याला पोटचा गोळा म्हणून सांभाळलं, मोठं केलं तेच कारटे आता माय-बापाला वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवु लागले. पण न्यायदेवता आंधळी नसते. तथा कायदा अशा धेंडावर चाबुकासारखा मारल्यावानी बसतो. असाच एका कौटुंबिक प्रकरणात कर्नाटक उच्च न्यायालयाने आईच्या बाजुने निकाल देताना तिच्या लेकराला थेट सवाल केला. तुम्ही बायको सांभाळायला सक्षम आहात तर मग आई का नको? असं म्हणत त्यांनी मुलाला प्रतिमहा दहा हजार रूपये देण्याचे आदेश काढले. व्यंकटमा असे या आईचे नाव असुन 84 वर्षाच्या आहेत.**

कर्नाटक निकालाची दखल घेण्यामागे आमची भुमिका सामाजिक दायित्वाची आणि संवेदनशीलतेची असुन वर्तमान सामाजिक जीवनात महाराष्ट्रात हाच प्रश्न ऐरणीवर आलेला असुन बर्‍यापैकी धेंडं आपल्या मातृसंस्थेला थेट वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवताना दिसतात. आश्चर्य म्हणजे सुशिक्षित वर्गात जास्त प्रमाण आणि शहरात मोठ्या प्रमाणावर दिसुन येतो. ग्रामीण भागात अजुन तरी जन्मदात्याविषयी लेकरांच्या मनात असलेली संवेदनशीलता मायेची आणि कर्तव्याची दिसते. वास्तविक पहाता जन्मदात्या आई-वडिलांचा सांभाळ हे तर प्रत्येक समाजात रूढी परंपरानुसार चालत आलेलं कौटुंबिक कर्तव्य आणि जबाबदारीचा भाग असु शकतो. पण यासाठी कायद्याचा आधार घेण्याची गरज भासते यापेक्षा दुर्दैव कोणतं नाही. खरं तर परमेश्वराच्या शोधात देशाच्या चारी दिशा भक्तीभावाने माणसं जातात. पण हे तितकंच स्पष्ट सांगायला पाहिजे की ज्यांच्या कुटुंबात आई-वडिल तेच खरे आपले दैवत आणि त्यातच परमेश्वर ज्याची सेवा मनोभावे करायला हवी. एक काळ एकत्र कुटुंब पद्धतीचा होता ज्यामध्ये उतरत्या वयात काळजी घेणारे अनेक हात असायचे. अलीकडच्या युगात विभक्त कुटुंब पद्धती ज्यातुन जन्मदात्याची परवड त्यांच्याच अवलादीकडून होताना दिसते. त्याची कारणं अनेक असु शकतात. पती-पत्नी नौकरीचा प्रश्न, त्याहुन अधिक आर्थिक परिस्थिती आणि सर्वात म्हणजे पत्नीला सासु-सासरे नको ही रूढ बळावताना दिसते. खरं तर मुलाचं लग्न झाल्यानंतर परक्याच्या घरून सुनबाई म्हणून आलेली मुलगी तिचं दैवत खर्‍या अर्थाने सासु-सासरे कारण जन्मदात्याकडील आयुष्याचा प्रयोग तिचा संपलेला असतो. पण याच सासु-सासऱ्याला लग्नानंतर घराबाहेर काढायला भाग पाडण्यात दोघांच्या सहमतीने निर्णय असतो. पुरूष चुकतो का? स्त्री? यापेक्षा ज्या कार्ट्याला माय-बापाने जन्म दिला त्याची नैतिकता आणि प्रामाणिकता त्यांचा सांभाळ आयुष्यभर करणं अगदी श्रावण बाळासारखं ही जबाबदारी नव्हे तर कर्तव्य ज्याला मायेचा ओलावा देखील म्हणता येईल. तो जर आपल्या दैवताविषयी मायेच्या धागेतुन कटिबद्ध असेल तर मग पत्नी कितीही कडक लक्ष्मी असली तरीही तिला देखील सासु-सासर्‍याची सेवा करावीच लागते. मात्र दुर्दैवाने पतीने नंदीबैलाचं रूप घेतलं असुन पत्नी सांगल तसं मान डोलावतो त्यातुन त्याची मनःस्थिती मातृ संस्थेच्या विरोधात जाते आणि ज्यांच्यामुळे मी आहे हेच उत्तरदायित्व विसरतो आणि सरळ वृद्धाश्रमाचा शोध घेतो. खरं तर ज्यांच्या संसारात भक्तीभावे आई-वडिलांची सेवा आणि पुजा होते त्यांच्यात परमेश्वराच्या आशिर्वादाने कुठल्याही गोष्टीची कमतरता भासत नाही. आर्थिक, भौतिक सुखाची वाढ



होते. लेकरं बाळं असतील किंवा एकुणच संसार अगदी गुलाब बागेसारखा फुललेला असतो. कारण तिथे मातृसंस्था टिकुन असते. पण ज्या कुटुंबात जन्मदात्याची परवड होते मग अनेक यातना त्यांना दिल्या जातात. तिथे देवाचा आशिर्वाद मिळत नाही. पण संसाराचं स्वरूप अगदी ओसाड दुष्काळ स्थितीसारखं पसरलेले असतं. वास्तविक पहाता हे चित्र सद्याच्या समाजात आहे. थोडंसे स्पष्ट यासाठी लिहावं वाटतं की येणारे अनुभव आणि कानावर येत असलेल्या गोष्टी किंवा याच प्रश्नावर न्यायालयात सुरू असणारे झगडे हे सारं ऐकल्यानंतर कुठे चालला समाज असं वाटतं? कौटुंबिक प्रकरणं हा खरं तर आता न्यायालयाचा अविभाज्य घटक बनला असुन अगदीच तालुका न्यायालयापासुन सत्र, जिल्हा, खंडपीठ, सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे विषय आहेत. जन्मदात्याचा सांभाळ मुलांनी केलाच पाहिजे म्हणुन सरकारला कायदे करावे लागले. एवढेच नव्हे तर भविष्यात असं घडेल हे लक्षात घेवुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा देशाची घटना तयार करताना अनेक कायदे तयार केले. त्याचाच आधार म्हणून आज न्यायालय मातृसंस्थेच्या बाजुने सत्यता सांगु शकते. कुटुंबातील भावंडं स्वार्थाने पैशाच्या मस्तीत चंगळवादाने भारावुन गेलेली असल्याने मी आणि माझी बायको आणि लेकरं याशिवाय त्यांना काहीच दिसत नाही. कधी तरी न्यायदेवतेलाच असा प्रश्न पडतो की, ही करंटी धेंडं स्वतःच्या पत्नीला सांभाळायला सक्षम, पण मातृसंस्थेलाच का सांभाळत नाहीत? त्यातूनच एक संवेदनशील निकाल कर्नाटक उच्च न्यायालयाने दिला. ज्यात स्पष्ट सांगितलं की तुम्ही स्वतःच्या बायकोला सांभाळू शकतात तर मग आश्रीत आईला का नाही? याहून चांगलं म्हणजे त्या कारट्याला दहा हजार रूपये प्रतिमहा आईला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. प्रकरण सांगायचं झालं तर व्यंकटमा 84 वर्षाच्या गोपाल आणि महेश त्यांची लेकरं. हे लेकरं जेव्हा आईचा सांभाळ करत नव्हते तेव्हा म्हैसुरच्या सहाय्यक आयुक्ताने दोन्ही मुलांना प्रत्येकी पाच हजार रूपये देण्याचे आदेश काढले होते. कारण आईने आयुक्ताकडे दाद मागितली होती. तदनंतर लेकरांनी उपायुक्ताच्या उच्च न्यायालयात धाव घेतली आणि त्याचा निकाल देताना दोन्हीही कार्ट्याला कानपिचक्या देत याचीका दाखल केली म्हणूनच अगोदर पाच हजारांचा दंड ठोठावला. आईला पैसे देण्याएवढे आर्थिक उत्पन्न नाही अशी याचिका दाखल केली होती. न्यायमुर्ती कृष्ण दिक्षीत यांच्या एकल खंडपीठाने निर्णय देताना तुम्ही गरिब आहात हा मुळातच दावा चुकीचा वाटतो. सक्षम पुरूष पत्नीच्या पालनपोषणास बांधील असतो. मग आश्रीत आईबाबतही हाच नियम लागू न होण्याचे कोणतेही कारण नाही. एक भाऊ जेव्हा सदृढ असतो तसाच दुसरा भाऊ असु शकतो असे निष्कर्ष देखील त्यांनी काढले. निकाल देताना न्यायालयाने पुराणातील उपनिषदाचा दाखला दिला. अक्षंती स्थवीरे पुत्र या ओळीचे महत्व पटवून देताना आयुष्याची सायंकाळ गाठलेल्या आईची काळजी घेणे पुत्राचे कर्तव्य आहे. वृद्ध आई-वडिलांकडे दुर्लक्ष करणे हेच घृणास्पद असून त्यासाठी कोणतेही प्रायश्चीत नाही.या आधारे स्पष्ट निकाल देत दोन्हीही भावंडांना दहा हजार रूपये प्रति महिना देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. दरम्यान देशात कुठल्याही न्यायालयाने दिलेला सामाजिक निकाल हा सर्वांना सर्व ठिकाणी लागू होतो. आपल्याकडे जन्मदात्याची परवड होणारे प्रकरणं मोठ्या प्रमाणावर वाढत असता किमान अशा धेंडांची डोळे उघडली तर बरं अन्यथा आई-वडिलांनी देखील अशा निकालाचा अभ्यास तथा आधार घेत आपल्या राशीला आलेल्या संघर्षाला तोंड देण्यासाठी कार्ट्याविरूद्ध न्यायालयाचे दरवाजे ठोठावणे क्रमप्राप्त वाटते. अध्यात्मिक शास्त्राचा आधार घेवुन सांगायचं म्हटलं तर जन्मदात्यांची सेवा हा प्रत्येकाच्या कर्तव्याचा भाग असतो आणि पुण्यकर्म देखील असते. पण जेव्हा अशी धेंडं केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी जगतात तिथेच वृद्धाश्रमाची वाट शोधणारी असतात. सांगायचं तात्पर्य की बाळांनो डोळे उघडा, मागे वळुन बघा, जन्मापासुनचा संघर्ष पहा, तुमच्या भविष्यासाठी माय-बापांनी काय खस्ता खाल्या? आणि हाडाची काडं केली जरा इतिहासाची पानं चाळुन बघा. तुम्ही आज कलेक्टर, तुम्ही आज अधिकारी, एवढेच नव्हे तर जे तुम्ही आहात ते केवळ मातृ-पितृ संस्थेमुळे पण तुमच्या डोळ्यावर स्वार्थाची आंधळी काजळी जडली तिला जरा बाजुला सारा आणि एक घास आई-वडिलांसाठी तरच दुसरा आपल्यासाठी या सद्गुणांने वागा मग बघा तुमच्या आयुष्याचं कल्याण. ज्यांच्या जीवनात आई-वडिलांच्या सांभाळण्यावरून कोर्टाची पायरी चढावी लागते, ज्यांना पत्नी आग्रहामुळे आई-वडिल नको वाटतात अशांच्या संसाराचा उन्हाळा झाल्याशिवाय रहात नाही. कितीही आणि कसंही जगाल तर अपयशाचं भुत पाठ सोडत नाही.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# ज्ञानसमुद्राचे निर्माते भगवान श्रीकृष्ण

आधुनिक केसरी

**भगवान श्रीकृष्ण यांच नाव डोळ्यासमोर आलं कि त्यांची एक वेगळी प्रतिमा डोळ्यासमोर येते. आपण बालपणी पासुन फक्त तितकंच ऐकलेल असतं. पण आपण जे ऐकलं त्यावर आपण चिंतन केलं नाही वास्तविक श्रीकृष्ण हे ज्ञान भांडार होते कलयुगात जे काही विज्ञान शोध लावत आहे ते सगळे शोध त्याच मुळ श्रीकृष्ण यांनी अर्जुनाला गीतेच्या माध्यमातून सांगितले होते. एकंदरीत जगातील वेगवेगळ्या क्षेत्रातील ज्ञान तत्त्वज्ञान याच मुळ भांडार भगवान श्रीकृष्ण यांनी निर्माण केल. ज्ञान समुद्र ज्यांच्या वाणीतुन प्रकट झाला.**

न्याय निती धर्म जगाला दाखवताना कर्म हेच कसं श्रेष्ठ असतं याची क्षणोक्षणी जाणीव करून देत अधर्म कितीही बलशाली असला तरी तो धर्मा समोर टिकत नाही हा कृतीशील बोध अंनत पिढ्यांना बोध व्हावा म्हणून धर्माच्या बाजुचे सारथी सारथ्य केले. मायाजाळ आणि हेवेदाव्याने भरलेल्या  सृष्टीमध्ये जर आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करयाचे असेल तर गरज आहे ती भगवान श्रीकृष्ण यांच्या आदर्शाची, विचारांची आणि त्यांनी सांगितलेल्या पथ मार्गावर मार्गक्रमण करण्याची. जीवनात मानवाच्याच वाट्याला सुखःदुख येत असतात याला अपवाद कोणीही नाही स्वतः मी देखील नाही याची जाणीव जगाला करून देताना वेळ काळ परस्थिती ला धैर्याने सामोरे असं स्वतः अनंत दुःखाचे वाटेकरी झालेले भगवान श्रीकृष्णा यांच्या इतके  सुख दुःख हे कोणत्याही व्यक्तीच्या वाट्याला आले नाहीत.जन्म तुरुंगात आणि जन्म झाल्याबरोबर खर्‍या आईला सोडून दुर जावे लागले दुर गेल्यानंतरही जन्मल्यापासूनच दुरवरती गोकुळामध्ये येवून दैत्य-दानव जिवावर उठत मारण्याचा प्रयत्न करु लागले तेथेही भगवतांनी आलेल्या संकटांना नष्ट करुन विजय मिळविला. पुढे प्रेम भेटले ते राधेचे तिला कायमचे सोडून मथुरेला दुष्ट कंसमामाचा वध करावयास जावे लागले तेथे मामाला मारले पण कोणताही मोह जवळ न बाळगता मथुरा सोडून दुरवर द्वारका नगरी वसवत स्वतःचे राज्य निर्माण केले. त्यामुळे कोणाचीही संपत्ती हडप करु नये हा देखील आदर्श जनांच्या समोर मांडला. पुढे नाते जपत असतांना सत्याची बाजू घेवून आत्याची मुले पांडवांना अनेक संकटातून वाचवले. द्रौपदीचे वस्त्रहरण कौरवांकडून होतांना एक भाऊ म्हणून भावाचे कर्तव्य  निभवतांना द्रौपदीचे वस्त्रहरण होवू दिले नाही. पुढे युद्ध जिंकण्यासाठी हतबल झालेल्या आणि आप्तजनांच्या गुरुजनांच्या नातेसंबंधामध्ये भावनिक झालेल्या अर्जुनाला युद्धात उतरविण्यासाठी भगवतगीता सांगितली ज्यामध्ये अर्जुनासह भविष्यातील जन्म घेणार्‍या मानवजातीला प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने ज्ञानबोध घेवून कर्तव्य कसे निभवावे, कोणाशी कसे वागावे,आपण खरे आहोत तर तमा कशाची बाळगावी, ज्ञान काय, जन्म काय, विधी काय, मृत्यू काय,  आत्मा हा अमर असून त्याला मृत्यू कधी येत नाही यासोबत अनेक उदाहरणे देता येतील याचा सारांश या भगवद गीता नावाच्या एका ग्रंथात प्रभू श्रीकृष्णांनी दिला आहे पुढे युद्ध जिंकून दिल्यानंतरही दोष भगवान श्रीकृष्णाला गांधारीने दिला व श्राप देखील दिला त्यामुळे चांगले वागणार्‍या व्यक्तीला सतत अग्नीपरीक्षा द्याव्या लागतात आणि दुःख त्याच्याच वाट्याला येते हे भगवान श्रीकृष्णाच्या जिवनपटावरुन जाणवतं. इतके झाल्यानंतरही दक्षिणेत रुक्मीणीच्या मागे येवून कलियुगात कलीला पाताळी गाडून पुढे विठ्ठल बनवून दुष्ट शक्तीला संदेश दिला की जे माझे नाव घेतील त्यांना आजही कलीची छाया देखील काही बिघडवू शकणार नाही त्यामुळे कलीयुग या एकाच युगात काय तर भगवान श्रीकृष्ण 28 युगे भक्तांची मदत करणारा देव राहिला आहे. त्यामुळे नीती-ज्ञान भांडाराचा रचियेता भगवान श्रीकृष्ण यांचा श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी किंवा हरे कृष्ण हरे कृष्ण हा एकच मंत्र भक्तगणांना संकटापासून दुर नेण्यासाठी उपयुक्त ठरेल ही मात्र ठाम अशी शाश्वती. हरे कृष्ण हरे कृष्ण । कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ या नामातच इतकी प्रचंड गोडी आहे की साक्षात तहान, भुक विसरुन फक्त भगवान श्रीकृष्णाचे नामजप करावा असं वाटावं इतकी विलक्षण महती या नामाची आहे .साक्षात  शुरवीर, ज्ञान भांडार, प्रेमाचे भांडार, कर्तव्य पालक धर्मरक्षक आणि सर्व भौतिक नाते संबंध ज्ञान मार्गावरून प्रभावी पणे सांभाळताना आणि देव असुन मानवी जीवन जगत असताना कुरूक्षेत्रावर युद्ध सुरु होताच कोणासाठीही न थांबत असलेल्या वेळेला देखील थांबवून पार्थ धर्नुधर अर्जुनाला सांगितलेली  भगवद्गीता जगासाठी प्रेरणादायी आहे आणि प्रत्येक नातं अगदी सचोटीने प्रमाणिक आणि न्याय पुर्ण निभवताना परिपुर्ण पुरूष होण्याचं भाग्य लाभलं ते भगवान कृष्ण यांना मानवी जीवन जगत आई वडील यांच्या छळाचा बदला घेतला , अनेक दुष्ट राक्षसांचा वध केला ,बाल लिला केल्या , धर्म-अधर्माचे युद्ध रचलं, इतकेच नाही तर तेही जिंकून दिलं आणि त्यामध्ये नितीच्या बळावर धर्माचा विजय घडवला. बहीणीच नातं म्हणुन पांचाली द्रौपदीचे अब्रुरक्षण केले, सुदामाचे मित्र प्रेम सांभाळले, भगवत गीता ज्ञान प्रकट केले, पत्नी म्हणून रुक्मीणी-सत्यभामा यांना योग्य न्याय दिला तर प्रेमिका म्हणून राधेला न्याय दिला पतीधर्म म्हणून पारिजातक फुल आणण्यासाठी देव इंद्रांशी युद्ध केले व पत्नीचा हट्ट पुरवुन तिला पारिजातक स्वर्गातून आणून दिले. बंधु म्हणून बलराम मोठया भावाचा मान यथायोग्य दिला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# डॉ. खत्री महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त रांगोळी महोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रांगोळी हा मुलींचा आनंदाचा व आवडीचा विषय. ठिपक्यांची रांगोळी, मुक्त हस्त रांगोळी, संस्कार भारती रांगोळी, पोर्ट्रेट असे रांगोळीचे विविध प्रकार आहेत आणि या सर्वच प्रकारात आता केवळ मुलीच नाही तर मुलांनाही आवड निर्माण व्हायला लागली आहे. शिवाय आता रांगोळीचेही विक्रम व्हायला लागले आहेत. नेमकी हीच पार्श्वभूमी ठेवून स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम चंद्रपूर दि. ०५ सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक दिनाचे निमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी भव्य रांगोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरूवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटोला माल्यार्पण करून करण्यात आली. या स्पर्धेत कनिष्ठ व वरीष्ठ आणि पदव्युत्तर विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला त्यात ११० विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विविध रांगोळ्या महाविद्यालय परिसरात सादर केल्या. त्यामुळे आज महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर विविध कलात्मक रांगोळ्यांनी सुशोभीत झाला होता.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी सुद्धा या रांगोळी महोत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यामुळे या रांगोळी महोत्सवात फारच प्रसन्न असे वातावरण दिसून आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे, प्रमुख अतिथी म्हणुन संस्थेचे सचिव डॉ. एस.बी. कपूर, तसेच संस्थेच्या कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर सोबतच डॉ. शरयु कटकमवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तसेच स्पर्धेकरिता छोटूभाई पटेल हायस्कुलचे शिक्षक श्री सुदर्शन बारापात्रे आणि सौ. स्नेहा धानोरकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. ही स्पर्धा सांस्कृतिक विभाग, संगणक विभाग व रसायनशास्त्र विभाग आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीनं आयोजित करण्यात आली.

# अंतरवाली घटनेच्या निषेधार्थ चारठाण्यात कडकडीत बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण करणाऱ्या मराठा आंदोलकांवर पोलीसांनी लाठीमार केल्याच्या निषेधार्थ सोमवारी सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने जिल्हाभरात अनेक ठिकाणी कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला उत्स्फूर्त मिळाला. यावेळी चारठाणा येथील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून बंदला पाठींबा दिला. आंदोलनकर्त्यांनी सकाळी९वा.चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड व महसुल विभागाचे चारठाणा तलाठी आर. एन. गायकवाड यांना निवेदन दिले.

येथील सकल मराठा समाजाच्या वतीने आज मंगळवार रोजी बंदची हाक देण्यात आली होती. मंगळवारी सकाळपासूच येथील बस स्थानक परिसरातील शिवाजी महाराज चौकात मराठा समाज बांधवांनी एकत्र येऊन सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. मंगळवार रोजी संपूर्ण दिवसभर शहरात कडकडीत बंद होते. येथील उपबाजार पेठेत, भाजीमंडईत खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले नाहीत. त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट दिसून येत होता. बंद दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विनोद साने यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमदार यु.टी.सातपुते, ऊमेश बारहाते,गजानन रोकडे,पवन राऊत, व्ही.व्ही.गरुड, सुधाकर कुटे,जिलानी शेख, गिराम, एस.आर वायाळ,यांच्यासह सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सायंकाळी उशिरापर्यंत बाजारपेठ बंद होती. आंदोलनकर्त्यांच्या वतीने सायंकाळी जिल्हा प्रशासनास विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मराठा समाजाच्या आंदोलनास येथील मुस्लिम बांधव व इतर काही समाज बांधवांनी पाठींबा दर्शवून आंदोलनात सहभाग नोंदविला. आंदोलनकर्त्यांनी मंगळवार सकाळी पोलीस व महसुल विभाग यांना आपल्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात



# सावळदबारा शिवारात बिबट्याने पाडला बकरीचा फडशा : भरपाई द्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबार येथे सावळदबारा बिबट्याची मोठी दशहत निर्माण झाली आहे. दि.३/९/२३ टिटवी शिवारात ज्ञानेश्वर चिखले यांच्या दोन बकऱ्या बिबट्याच्या हल्लात ठार झाल्या आहेत आणि त्याच रात्री सावळदबारा शिवारात बिबट्याचे हल्ल्यात एक बकरी ठार झाले आहेत त्यामुळे सावळदबारा टिटवी. पळसखेडा परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहेत. सावळदबारा येथील विनोद सुभाष कोते सामाजिक कार्यकर्ते यांच्या शेतात बांधलेल्या गायगोठातून गट.क्र. ३०१ सावळदबारा शिवारात दि. ४ सप्टेंबर रात्री १२ च्या सुमारास बिबट्याने हल्ला करून एक बकरी ठार केले आहेत.सावळदबारा येथील शेतकरी यांची एक बकरी बिबट्याचे हल्ल्यात बकरी ठार झाले आहे. त्यामुळे. सावळदबारा सह पळसखेडा. टिटवी. या परिसरात भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहेत सावळदबारा हा डोंगर भाग आहेत वनपरिक्षेत्र अधिकारी एन. जे. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सावळदबारा वनरक्षक सुनील खरडें,एम. आर. शेख व वनरक्षक पळसखेडा डि.ए. वाघ




यांनी पंचनामा केला आहे.यावेळी पत्रकार जब्बार तडवी, अर्जुन कोते, पियूष कोते वल्ली तडवी, उपस्थित होते लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी डॉ सुपडा ससाणे व शेतकरी विनोद कोते करित आहेत बिबट्याने हल्ला करून बकरीला ठार केले. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अजिंठा वनपरिक्षेत्रा कडून लवकरात लवकर देण्यात यावी अशी मागणी डॉ सुपडा ससाणे यांनी केली आहे.एकतर अगोदरच शेतकरी पाऊसा अभावी संकटात सापडला आहे पिके वाळत आहे.





महाराष्ट्र Business Katta









# आयुर्वेद सिटी- आरोग्यमय ऊर्जाशक्ती, विश्वासाची गॅरंटी अन् वारीची भक्ती



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**आयुर्वेद सिटीच्या माध्यमातून "विश्वसनिय व उल्लेखनीय" आणि "निरोगीमय व वारीमय" हा प्रवास सोबत घेऊन जाणारे आयुर्वेद क्षेत्रातील नामवंत डॉक्टर दांपत्य डॉ. मिलिंद काकडे व डॉ.ज्योती काकडे पाटील यांची ओळख महाराष्ट्राला परिचित आहे. विविध इलेट्रॉनिक चॅनेल्सवर आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी हे दोघेही दिसत असतात. आयुर्वेद क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या काकडे दांपत्याकडून गेली २५ वर्षांपासून आरोग्य सेवा दिली जात असून आतापर्यंत त्यांनी लाखो रुग्णांवर यशस्वीपणे उपचार केलेले आहेत. १४ वर्षांपूर्वीच म्हणजे ६ सप्टेंबर २००९ साली डॉ. मिलिंद काकडे व डॉ.ज्योती काकडे पाटील यांनी २० बेडचे "आयुर्वेद सिटी"या हॉस्पिटलची निर्मिती चांदोबाचा लिंब, तरडगांव येथे केली.**

चांदोबाचा लिंब ह्या परिसरात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील अश्वाचे पहिलं उभे रिंगण संपन्न होत असते. त्यामूळे या ठिकाणची ओळख वारीच्या विषयी ऐतिहासिक अशी समजली जाते. काही महिन्यांपूर्वीच प्रबोधनाच्या हेतूने काकडे दांपत्यांनी आयुर्वेद सिटीच्या संरक्षक भिंतीवर आयुर्वेद संबंधित व पालखी वारीची विशेष माहिती पट देणारी शिल्पे साकारलेली आहेत.आतील भागात ६ फुटी भव्य धन्वंतरीची मुर्ती उभारली आहे. एकंदरीत हा परिसर एक सकारात्मक व निरोगीमय उर्जेने भरलेला असून रुग्णांना याचा फायदा मिळत आहे.आज आयुर्वेद सिटी १४ व्या वर्षात पदार्पण करत आहे.हे आयुर्वेद सिटीचं वैभव रुग्णांना निरोगी आरोग्य देणाऱ्या श्रीमंतीने फुललेलं आहे.जेष्ठ समाजसेवक पद्मविभुषण आण्णा हजारे यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या आयुर्वेद सिटीच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी साहित्य क्षेत्रात विचारांच्या सौंदर्याने माणसं घडविणारे साहित्यिक प्राचार्य शिवाजीराव भोसले हे होते.खऱ्या अर्थाने या दिवसापासूनच आयुर्वेद सिटीचा प्रवास सुरू झाला अन ही आयुर्वेद सिटी इथे आलेल्या रूग्णांना निरोगीमय करणारी व ऊर्जा शक्ती देणारी संजीवनी ठरली. महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील आणि परदेशातून येणाऱ्या अनेक रुग्णांना आयुर्वेद सिटीच्या प्रभावी व गुणकारी उपचारांचा गुण आलेला आहे. डॉ.मिलिंद काकडे व डॉ.ज्योती काकडे पाटील यांच्या रूग्णसेवेला २५ वर्ष पूर्ण होत आहेत तसेच "आयुर्वेद सिटी" हॉस्पीटलचा १४ वा वर्धापन दिन साजरा होताना हे दोन्ही क्षण आनंदाचे बनले आहेत.रुग्णांची शारिरीक व्याधी दूर करण्याचा १००% प्रयत्न केला जात असल्याचे समाधान काकडे दांपत्यांना मिळत असते.ही उभी राहिलेली आयुर्वेद सिटी याचे सर्व श्रेय काकडे दांपत्य आपले गुरूवर्य बृहत्त्रयी रत्न वैद्यराज दातारशास्त्री (सांगली),गुरूवर्य विवेक हळदवणेकर सर (कोल्हापूर),तसेच वैद्यराज दाताशास्त्री गुरूकुलातील जेष्ठ श्रेष्ठ सहपाठीना,आई-वडिल, हितचिंतक,मित्र परिवाराला देतात. डॉ.मिलिंद काकडे पाटील यांच्या आयुर्वेद चिकित्सेबद्दल सांगायचं म्हटलं तर त्यांनी सन १९९८ साली फलटण व लोणंद येथे शुद्ध आयुर्वेदिक चिकित्सा व पंचकर्म चिकित्सेची प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून ते आता पर्यंत त्यांचा आयुर्वेद क्षेत्रात रुग्णांच्या दृष्टीने आरोग्यमय अशीच घौडदौड सुरू आहे. पॅरालिसिस चे ६५०० रुग्ण, मतीमंद, गतीमंद, स्वमग्न इ. चे ७५०० रुग्ण, मणक्यांचे आजाराचे १२००० पेक्षा जास्त रुग्णांवर उपचार करून ३५०० च्या वर रुग्णांच्या मणक्यांची शस्त्रक्रिया करण्यापासून टाळली आहे.संधीवात, आमवात, वातरक्त,अस्थिगतबात इत्यादी आजरांचे १०००० पेक्षा जास्त रूग्णांवर उपचार केले असून १५०० पेक्षा जास्त रूग्णांच्या सांध्यांचे ऑपरेशन वाचविले आहेत.संशोधीत पांचभौतिक चिकित्सा, पंचकर्म चिकित्सा, केरलीयन उपचार करून मेंदूचे विकार, पॅरालिसिस, मतिमंदत्व, गतीमंदत्व, स्वमग्न, मणक्यांचे



विकार, मानदुखी, कंबरदुखी, सांध्याचे विकार, संधीवात, आमवात, वातरक्त, सांध्याची झीज होणे इ. तसचे पचनाचे सर्व विकार ग्रहणी, बध्दकोष्टता, अम्लपित, गॅसेस, मुळव्याध यावर मूलगामी उपचार हे आयुर्वेद सिटी मध्ये केले जातात. आहारपद्धती, विहारपध्दती, अनियमीत  वेळी जेवण, झोप, मानसिक ताणतणावामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कोलेस्ट्रॉलची वाढ, लठ्ठपणा इ.लाईफ स्टाईल डिसिज चे प्रमाण वाढले असून अगदी कमी वयात लोकांना हे आजार उदभवत आहेत. यासाठी "आयुर्वेद सिटी" मध्ये संशोधीत पंचकर्म उपचार केले जातात व त्याचा लाभ हजारो रुग्णांनी घेतला आहे.स्त्रीयांमध्ये नोकरी-व्यवसायात होणारे उशीरा लग्न या मुळे स्त्रीयांमध्ये घर सांभाळताना P.C.O.D. थायरॉईड, वंध्यत्व, मासिक पाळीच्या तक्रारी वाढत असून होणारे मुलं हे सदृढ व्हावे यासाठी " आयुर्वेद सिटी" मध्ये गर्भसंस्कार उपचार केला जातो.

तसेच स्त्रीयांच्या सर्व आजारावर डॉ. जोती काकडे (पाटील) या स्वतः स्त्री रूग्णांच्या शरीरीक, मानसिक, कौटुंबिक, सामाजीक जीवनाचा विचार करून औषधोपचार व समुपदेश करतात. कोरोना झाल्यानंतर अनेक रूग्णांना विविध आजारांनी ग्रासले असून, अश्या रूग्णांची संपूर्ण शरीरशुद्धी करून त्यांची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी संशोधीत पंचकर्म उपचार "आयुर्वेद सिटी" मध्ये केले जातात.विविध व्याधींवर विश्वासाने आयुर्वेद सिटीतून आयुर्वेदाची उपचार पध्दती राबविणारे डॉ. मिलिंद काकडे आणि डॉ.ज्योती काकडे पाटील हे दोन्ही दांपत्य आयुर्वेद क्षेत्राला चमकविणारे व रुग्णांच्या आयुष्याला सुख आणि समृद्धीने घडविणारे डायमंड बनलेले आहेत.

**हॉस्पिटल पत्ताः चांदोबाचा लिंब, लोणंद-फलटण रोड, तरडगांव ता. फलटण, जि. सातारा. अधिक माहितीसाठी- 9561808777, 7744900901**

# ।। कृष्णं वंदे जगद्गुरूम् ।।



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**भगवान श्रीकृष्ण किंवा पंढरीचा पांडुरंग कुलदैवत असणाऱ्या मंडळींच्या घरी गोकुळ अष्टमी नवरात्र हा कुळधर्म असतो. श्रावण वद्य प्रतिपदेला ते सुरू होते आणि अष्टमीच्या दिवशी म्हणजे श्रीकृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी पारणे सोडल्यावर हे नवरात्र उठते.**

विशेषतः भागवत पुराणाचे वाचन या नवरात्रात करण्यात येत असते. अष्टमीला श्रीकृष्ण, देवकी, यशोदा, नंद, गाई वगैरेंच्या प्रतिमा करून त्या गोकुळाची पूजा रात्री बारा वाजता करून कृष्णजन्म साजरा करण्यात येतो. रात्री कथा, पुराण, नृत्य, गीत इ. कार्यक्रमांनी जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवतात. नवमीच्या दिवशी पंचोपचारांनी उत्तरपूजा करून महानैवेद्य अर्पण करतात. माणसाने जीवन कसे जगावे आणि कसे जगू नये हे सांगणारा बोधपर ग्रंथ म्हणजे श्रीमद्भगवद्गीता. परंतु हे तत्त्वज्ञान कोणत्याही विशिष्ट धर्मियांसाठी नसून ते विश्वातील मानवासाठी भगवंतांनी अर्जुनाला उद्देशून सांगितलेले आहे.

किंबहुना हे तत्त्वज्ञान सांगण्यासाठीच भगवंतांनी आठवा अवतार घेतला. याला पूर्णावतार म्हणतात. कंसमामाला म्हणजेच एका महान दुष्ट प्रवृत्तीला संपविणे हाही त्यांचा हा अवतार घेण्यामागील हेतू होता. भगवंताचा हा अवतार परिपूर्णतम आहे. श्रीकृष्णाने १२५ वर्षे राज्य केले. यदुवंशेऽवतीर्णस्य भवतः पुरुषोत्तम। शरच्छतं व्यतीताय पंचविंशाधिकं प्रभो।।

या सव्वाशे वर्षात श्रीकृष्ण ११ वर्षे गोकुळ, १४ वर्षे मथुरा आणि १०० वर्षे द्वारकेत राहिले.

**मनुष्यलोकी मनुष्यमर्यादा ।शतवर्षे जी गोविंदा ।ते अतीक्रमोनी अवदा ।अधिक मुकुंदा पंचवीस जाहली ।।**

यशोदेचा लाला कृष्ण, नंदाचा बाळकृष्ण, गौळणी बरोबरचा युगुलकृष्ण, गोपाळांबरोबर गोपालकृष्ण, राधेसोबतचा राधाकृष्ण, मथुरेतील श्रीकृष्ण, द्वारकेतील भगवान कृष्ण, अर्जुनाच्या रथावरील योगेश्वर कृष्ण या प्रत्येक वेगळ्या भूमिकेतून भगवान कृष्ण आपल्याला वेगळी शिकवन देतात. देवकी आणि वसुदेव यांचा हा आठवा पुत्र.



देवकी कंसाची बहीण होती. तिचे लग्न वसुदेवाशी झाले. तेव्हा त्यांचा रथ स्वतः कंस चालवत होता. तेवढ्यात आकाशवाणी झाली की,"हे कंसा, या तुझ्या देवकी बहिणीच्या आठव्या पुत्राच्या हातूनच तुझा वध होणार आहे." हे ऐकताच कंसाचे मन फिरले. त्याने देवकीला ठार मारण्याचे ठरविले, परंतु वसुदेव म्हणाला "हिला होणारी मुलं मी तुजपाशी देईल त्यांना तू मारून टाक."

कंसाने ही गोष्ट मान्य केली आणि वसुदेव-देवकी यांना आपल्या कारागृहात ठेवले. देवकीला झालेली सात मुले कंसाने तिथे मारली. कारण आठवी ही संख्या कोणत्या मुलापासून धरायची असा प्रश्न त्याला पडला. त्यामुळे आठवा मुलगा कोणता हे कळणे शक्य होईना. तेव्हा त्याने देवकीला झालेले प्रत्येक मूल याप्रमाणे त्याने सहा मुले मारली. देवकीचा सातवा गर्भ बलराम होय. याला योगमायेने विष्णूच्या आज्ञेवरून वसुदेवाची दुसरी पत्नी रोहिणी हिच्या गर्भात प्रविष्ट केले. त्यामुळे बलराम वाचला. नंतर त्या करागृहातच देवकीला आठवा मुलगा झाला. ती मध्यरात्र होती श्रावण वद्य अष्टमीची. हा चतुर्भुज महाविष्णू स्वरूपात देवकीपुढे प्रकट झाला. वसुदेव देवकीने स्तवन केल्यावर कृष्ण पुन्हा बालरूप धारण करून अर्भक बनला. या मुलाला वसुदेवाने आपला मित्र नंद याच्याकडे गोकुळात नेऊन दिले आणि नंदाची बायको यशोदा हिला झालेली मुलगी कारागृहात देवकीपाशी आणून ठेवली. दुसऱ्या दिवशी कंस ती मुलगी शिळेवर आपटू लागला तोच ती योगमाया त्याच्या हातून निसटली आणि आकाशात उडाली आणि कंसाला म्हणाली अरे, तुला ठार मारणारा आठवा देवकी पुत्र भूतलावर वाढत आहे. पुढे श्रीकृष्णाने कंसाचा वध केला. त्या श्रीकृष्णाचा हा जन्मदिन म्हणून श्रावण वद्य अष्टमीला कोणी म्हणतात कृष्णाष्टमी! कोणी म्हणतात गोकुळाष्टमी! तिच्या दुसऱ्या दिवशी सर्व गोप दहीहंडीचा खेळ खेळतात. म्हणून यावेळी कृष्णभक्त आपापल्या घरी कृष्णाष्टमी नवरात्रोत्सव साजरा करीत असतात. हा कृष्णाजयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, पुरी इत्यादी क्षेत्रात या उत्सवाचा विशेष थाट असतो. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर हा दिवस विशेष भक्तीने पाळतात. कित्येक वैष्णव देवस्थानातून दीपआराधना, पालखी, आनंदोत्सव, कृष्णलीलेचे खेळ, भागवताचे वाचन, कीर्तन, भजन, नृत्य- गायन इ. कार्यक्रम प्रतिपदीपासून अष्टमीपर्यंत चालतात. वृंदावनात या दिवसात होणारा दोलोत्सव प्रेक्षणीय असतो. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात या उत्सवानिमित्त दही काला होतो. गोविंदा आला रे आला ।गोकुळात आनंद झाला ।। असे गाणे गात अनेक लहानथोर पुरुष घरोघरी नाचायला जातात. दहीहंड्या फोडतात. कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून कृष्णचरित्रातले सोंग आणण्याची प्रथा आहे. हे व्रत केल्याने संतती, संपत्ती व अंती वैकुंठ लोक याची प्राप्त अंतिम वैकुंठ लोक याची प्राप्ती होते असे मानतात. भगवान श्रीकृष्ण आपल्याला आश्वस्थ करून गेले आहेत ते सांगतात-

**यदा यदा हि धर्मस्य**
**ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं**
**सृजाम्यहम्।**
**"परित्राणाय साधूनां" विनाशाय च**
**दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे**
**॥**

जेव्हा जेव्हा धर्माची हानी होते, तेव्हा मी येतो, मी प्रकट होतो. जेव्हा जेव्हा अधर्म। वाढतो तेव्हा तेव्हा दुष्टांचा विनाश करण्यासाठी, सज्जनांच्या रक्षणासाठी, धर्माच्या स्थापनेसाठी मी युगानुयुगे जन्म घेत असतो. आपण सर्वांनी हे लक्षात ठेऊन आपल्या हातून कुणाचेही नाहीत होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. **वसुदेवसुतंदेव कंस चाणूर मर्दनम्। देवकी परमानंदम् कृष्णं वंदे जगद्गुरूम् ।।**

# शिक्षक दिनाचे महत्त्व

आधुनिक केसरी

**गुरु-शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीमधील एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र भाग आहे. जीवनात आई- वडिलांची जागा कुणीही भरू शकत नाही कारण आम्हाला या सुंदर जगात आणण्याचा श्रेय असल्याने जीवनातील सर्वात पहिले गुरु आमचे आई-वडील असतात. भारतात प्राचीन काळापासून गुरु- शिष्य परंपरा असून शिक्षक हे आम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात.**

योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात. कधी आणि का साजरा केला जातो शिक्षक दिन दरवर्षी 5 सप्टेंबर या दिवशी शिक्षक दिन साजरा केला जातो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म-दिवसाच्या निमित्ताने शिक्षकांप्रती सन्मान प्रकट करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. 'गुरु' यांचे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्व असतं. समाजात त्यांचे एक विशिष्ट स्थान असतं. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणात विश्वास ठेवत असून ते एक महान दार्शनिक आणि शिक्षक होते. त्यांना शिक्षणाप्रती अत्यंत प्रेम होते. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांच्यात सर्व गुण विद्यमान होते. या दिवशी संपूर्ण देशात भारत सरकारद्वारे श्रेष्ठ शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केलं जातं. शिक्षकांच्या हातात देशाचे भविष्य असतं कारण शिक्षकांमुळे भविष्यातले डॉक्टर, शास्त्रज्ञ, इंजिनियर, लेखक, शिक्षक आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करून देशाचे नाव उंचवणारे सामर्थ्यवान पिढी तयार होते. आई-वडिलांनंतर शिक्षकांकडून बऱ्याच नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. म्हणूनच शिक्षकांना दुसरे पालक ही म्हटले जाते. आपले विचार, मत आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यामागे शिक्षकांचा मोठा वाट असतो. चांगले संस्कार, शिस्तीत राहणे, आणि योग्य शिक्षणा देऊन जगासमोर उभं राहण्याची ताकद शिक्षकांमुळे येते. या नात्याचा महत्त्व समजवण्यासाठी आणि शिक्षकांप्रती प्रेम व्यक्त करण्यासाठी हा दिन साजरा केला जातो.

या दिवशी अनेक शाळा आणि कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम जसे उत्सव, शिक्षकांप्रती आभार व्यक्त करणे किंवा आपले मनोगत व्यक्त करणे असे आयोजन केले जातात. अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थी वेगवेगळ्या पद्धतीने शिक्षकांचे सन्मान करतात. अनेक विद्यार्थी पुष्पगुच्छ, भेटवस्तू, ग्रीटिंग देऊन आभार प्रदर्शन करतात.

शिक्षक एकाच बागेत विभिन्न रूप आणि रंगाचे फुलं सजवणाऱ्या माळ्याप्रमाणे असतो. विद्यार्थ्यांना काट्यांवर हसत चालण्यासाठी प्रेरित करतात. आज प्रत्येक घरात शिक्षा पोहचवण्या प्रयत्न केला जात आहे. आणि शिक्षित भारत हे प्रत्येक शिक्षकांचे स्वप्न असतं म्हणून शिक्षक हे सन्मानाचे हक्कदार आहेत. कारण शिक्षकच चांगले चरित्र निर्मित करू शकतात.

आज शिक्षणाचा बाजार झाला असून ज्ञानाची बोली लावली जाते. वर्तमानात गुरु-शिष्य परंपरा कलंकित होत आहे. अनेकदा शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांशी तर विद्यार्थ्यांद्वारे शिक्षकांसोबत दुर्व्यवहार होत असल्याच्या बातम्या येत असतात. हे बघून आमच्या संस्कृतीची या अमूल्य गुरु-शिष्य परंपरेवर प्रश्न मांडण्यात येतात. विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांचे दायित्व आहे की या महान परंपरेला उत्तम रित्या समजून समाज निर्माणात आपले सहयोग प्रदान करावे.

रवि जाधव कोतापकर
डोंबिवली

# || भक्तीचे बेणे ||



ध्यानी मनी नाही, पंढरीशी जाणे
तरी बोलावणे, आलेच की

नाही हो म्हणता, गाठले ते पीठ
विठूराय धीट, जेथं उभे

वारकरी थोर, बाया पोरे पोक्त
भाव तो विरक्त, देखियेला

भिजविले पाय, भीमेच्या पाण्यात
झंकार विण्यात, ऐकीयेला

नाम्याच्या पायरी, टेकवीला माथा
तुकोबाची गाथा, आठविली

विठ्ठलाचे मुख, देखियेले डोळा
येऊ कैक वेळा, गुज केले

नैवद्याचा लाभ, मठामाजी झाला
जणू गोड काला, प्रसादाचा

देवाची महती, पंढरीची ख्याती
आली हो प्रचिती, प्र त्यक्षात

चैतन्याचे स्थळ, मना येते बळ
भक्ती परिमळ, चहुंकडे

विठ्ठलाच्या दारी, खेळली फुगडी
भाव तो बेगडी, वरमला

निरोप तो घेता, ओढवेना पाय
संसारीची बाय, वाट पाहे

सालोसाल असे, घडो पुन्हा येणे
भक्तीचे ते बेणे, रुजो अंगी

-भानुदास धोत्रे, परभणी
7972625086

# अध्यात्मातून लाभते मनाला तंदुरुस्ती : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** कित्येक युगे लोटली, पण प्रत्येक युगात भागवत कथेचे, आध्यात्माचे महत्त्व कायम आहे. ईश्वराच्या साधनेने प्राप्त होणारी ऊर्जा कायम आहे. त्यामुळे तुम्हाला जर मन तंदुरुस्त ठेवायचे असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

तीर्थरुपनगर येथील राधेश्याम मंदिरात आयोजित भागवत ज्ञान कथा कार्यक्रमात मुनगंटीवार सहभागी झाले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ह.भ.प.मयूर महाराज, भाजपा महानगर अध्यक्ष राहुल पावडे, भाजयुमोचे सुनील डोंगरे, अंबादास पिंपळकर, रामचंद्र डोंगरे, प्रभाकर राऊत, एकनाथ दरवेकर, भारती बोभाटे, नीलिमा तळवेकर, चंद्रशेखर झिलपे, गोवर्धन तिवस्कर, अर्जुन सिडाम आदींची प्रमुख उपस्थिती होती. मुनगंटीवार म्हणाले, 'ज्याप्रमाणे शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी भोजन आवश्यक आहे, त्याचप्रमाणे मन तंदुरुस्त ठेवण्यासाठी अध्यात्म, भागवत कथा आवश्यक आहे. आणि आज संपूर्ण जगाने भारताचे हे वैशिष्ट्य मान्य केले आहे. ज्या देशांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रगती केली आहे, त्या देशांनी अध्यात्माचे महत्त्व आणि फायदे दोन्ही मान्य केले आहे. १८व्या शतकात तंत्रज्ञानाचा अभाव होता, पण आनंदाचा आणि समाधानाचा प्रभाव होता. आज उलट परिस्थिती आहे. पूर्वी आपण 'हम साथ साथ है' म्हणायचो आज प्रत्येक जण एकमेकांना 'हम आपके है कौन?' असे विचारतो.'




**वारीमध्ये येते प्रचिती** : पांडुरंगाच्या वारीचा प्रारंभ करण्यासाठी आळंदीला गेलो तेव्हा खरा आनंद, खरे समाधान मला बघायला मिळाले. वारीत सहभागी झालेला एखादा वारकरी आर्थिकदृष्ट्या गरीब असतो. त्याची परिस्थिती हलाखीची असते. मात्र, पांडुरंगाच्या भक्तीची ऊर्जा त्याच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित होते आणि तो सदैव प्रसन्न, आनंदी आणि समाधानी असतो. मला याची प्रचिती प्रत्यक्षात घेता आली. ईश्वराची आराधना केल्याने जी ऊर्जा प्राप्त होते, ती आणखी कशानेही प्राप्त होत नाही. त्यामुळेच पूर्वीपासून 'जो काम दवा नहीं कर सकती वो दुवा कर देती है', असे म्हटले जाते,' असेही मुनगंटीवार म्हणाले.

## संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवाला सुरवात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** श्रीक्षेत्र आपेगाव येथे सोमवारपासून ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मोत्सवला प्रारंभ झाला असून या निमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहभर चालणाऱ्या सोहळ्यात कलश पूजन काकडा भजन विष्णुसहस्त्रनाम ज्ञानेश्वरी पारायण बाळक्रिडा गाथा भजन हरिपाठ व दररोज ख्यातनाम किर्तनकाराचे किर्तन होणार आहे. गुरुवारी ७ सकाळी आकरालामिरवणूक काढण्यात येईल. रात्री माऊलीचा महाभिषेक पुष्पवृष्टी तसेच ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूर कर संस्थानचे अध्यक्ष यांचे किर्तन होईल. काल्याच्या दिवशी बालवारकरी व तरुण मंडळीच्या हस्ते दहीहंडी होणार आहे. ११ रोजी महाप्रसादाचा कार्यक्रम होवून सागंता होइल या सप्ताह काळात भाविकांनी मोठ्या संख्येन उपस्थित राहून जन्मोत्सव सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर संस्थान व ग्रामस्थानी केले.

## स्वयंरोजगारासाठी भगिनींना प्रशिक्षित करण्याचा संकल्प : जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राखीचा दोरा हा नुसता दोराच नसून तो बहिण- भावाच्या नात्याचे प्रतिक आहे. ते एक शील, प्रेमळ, मायाच्या पवित्र्याचे रक्षण करणारे बंधन आहे. भगिनींचे रक्षण करत असतांना त्यांना आत्मनिर्भरपणे जगता यावे यासाठी आमचे प्रयत्न सुरु असुन भगिनींना स्वयंरोजगार निर्मीतीसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याचा आपण संकल्प केला असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी यंग चांदा ब्रिगेड च्या महिला आघाडीच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला कल्याणी किशोर जोरगेवार, गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार, यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावकर, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, बंगाली समाज शहर संघटिका सविता दंडारे, सायली येरणे, आशा देशमूख, विमल कातकर, अस्मिता डोणारकर, कौसर खान, निलिमा वनकर, कल्पना शिंदे, वैशाली मेश्राम, सोनाली आंबेकर, वंदना हजारे यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या महिला पदाधिका-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, यंग चांदा ब्रिगेड संघटनेच्या वतीने सामाजिक क्षेत्रात मोठे काम केल्या जात आहे. हे काम होत असतांना महिला नेहमी केंद्रस्थानी राहिल्या आहे. महिलांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी आपण महिलांना होणा-या आजारा संदर्भात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन केले आहे. तर महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी आपण स्वयंरोजगारा संदर्भातले विविध प्रकारचे प्रशिक्षण महिलांना



उपलब्ध करुन देत आहोत. यात ब्युर्टी पार्लर, शिवणकाम यासह अनेक प्रकारच्या प्रशिक्षणांचा समावेश आहे. यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आयोजित या प्रशिक्षण शिबिरामध्ये आता प्रयत्न आपण 2 हजाराहुन अधिक महिलांना प्रशिक्षीत केले असल्याचेही यावेळी बोलतांना ते म्हणाले.

यंग चांदा ब्रिगेड ही एक संघटना नसुन परिवार आहे. या परिवारातील प्रत्येक महिला ही आंनदी आणि निरोगी असली पाहिजे या दिशेने संघटना काम करत आहे. राखी चा दोरा हा नुसता दोराच नसून तो बहिण- भावाच्या नात्याचे प्रतिक आहे. आज आपण मझ्या मनघटाला राखीचा पवित्र धागा बांधला आहे. त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे. आपल्या प्रत्येक कठीण काळात हा भाऊ आपल्या पाठीशी उभा राहणार असल्याचेही यावेळी बोलतांना आ. जोरगेवार म्हणाले


यावेळी महिला भगिनींनी आमदार किशोर जोरगेवार यांना राखी बांधली. आमदार किशोर जोरगेवार यांनीही आपल्या बहिणींना ओवाळणी स्वरुप भेट वस्तू दिल्यात. आपले प्रेम असेच कायम राहिली अशी अपेक्षाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी बोलून दाखविली. या कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेडच्या महिला सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महिलांमधील कॅन्सरचे वाढते प्रमाण

आधुनिक केसरी

**कॅन्सर हा शब्द जरी कानावर पडला तरी संबंधित व्यक्ती सह संपूर्ण कुटुंबच हादरून जातं. त्यातही आज आपण जेव्हा कोणतेही वृत्तपत्र वाचतो, बातम्या ऐकतो किंवा समाजामध्ये राहात असतांना जेव्हा एकमेकांसोबत चर्चा करतो तेव्हा हल्ली महिलांमधील स्तन कॅन्सर ( ब्रेस्ट कॅन्सर) आणि गर्भाशय मुखाचा कॅन्सर ( सर्वाइकल कॅन्सर ) यांच प्रमाण दिवसेंदिवस खूप वाढत चाललंय अस लक्षात येतं. आणि म्हणूनच दैनिक आधुनिक केसरी च्या वाचकांना या विषयावर सविस्तर माहित व्हावी आणि आपले वाचक जागरूक होऊन , सजग होऊन आपल्या व आपल्या परिचयातील लोकांची काळजी घेऊ शकतील या दृष्टिने आपण काही करायला हवं असा विचार मनात आला.**

या विषयावर योग्य मार्गदर्शन मिळावं व त्यातून जाणिव जागृती निर्माण व्हावी यास्तव आम्ही विदर्भातील एक सुप्रसिद्ध नामवंत डॉक्टर पल्लवी ईंगळे ज्या चंद्रपूर मधे सुविख्यात डॉक्टर म्हणून



प्रसिद्ध आहेत त्यांची भेट घेतली. व या विषयावर त्यांच्याकडून जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. दैनिक आधुनिक केसरी च्या वाचकांपर्यंत ही माहीती पोहोचवित असतांना एकच ईच्छा ,अपेक्षा आहे ती एवढंच की आपण ही माहिती वाचा व इतरांनाही याबाबत अधिकाधिक माहीती द्या बस एवढेच.

सर्वप्रथम आपण गर्भाशय मुखाचा कॅन्सर अर्थात सर्वाइकल कॅन्सर बाबत जाणून घेणार आहोत.

गर्भाशय मुखाचा कॅन्सर म्हणजेच सर्वाइकल कॅन्सर. शरीरातील नॉर्मल पेशींची अनियंत्रित वाढ होणे यालाच कॅन्सर होणे असे म्हणतात. स्त्रियांमध्ये होणाऱ्या कॅन्सर मध्ये हा कॅन्सर महत्त्वाचा आहे कारण , या कॅन्सरने भारतात दरवर्षी 77 हजार स्त्रिया मृत्युमुखी पडतात. तसेच दरवर्षी जवळपास एक लाख पंचवीस हजार नवीन रुग्णांची नोंद केली जाते. भारतात दर आठ मिनिटाला एक स्त्री या कॅन्सरमुळे मृत्युमुखी पडते. हा कॅन्सर एचपी व्ही नावाच्या एका वायरस मुळे होतो. म्हणजेच ह्यूमन पेपिलोमा वायरस. या व्हायरसचा शिरकाव स्त्रीच्या शरीरात योनीमार्गातून होत असतो.

ह्या कॅन्सरची लक्षणे

1. योनीमार्गातून पांढरे पाणी वारंवार जाणे
2. संबंधांनंतर रक्तस्त्राव होणे.
3. दोन पाळ्यांच्या मध्ये रक्तस्त्राव होणे.
4. ओटी पोटात दुखणे

हा कॅन्सर होण्याची मुख्य कारणे

1. कमी वयात होणारे लैंगिक संबंध
2. एकापेक्षा जास्त व्यक्तींसोबत होणारे लैंगिक संबंध
3. वारंवार होणाऱ्या गर्भधारणा
4. मासिक पाळी दरम्यान स्वच्छता न पाळणे
5. अनुवंशिकता

हा कॅन्सर 30 ते 65 या वयोगटात जास्त प्रमाणात आढळतो. आज-काल तरुण मुलामधे वयाच्या अगदीच 25 व्या वर्षी ही काही स्त्रियांमध्ये कॅन्सर दिसतो. याच कारण बरेचदा काही अंशी कमी वयात महाविद्यालयीन जिवनातच होणारे असुरक्षित असे लैंगिक संबंध. ज्यावर आपण नियंत्रण ठेवू शकतो.

त्यामुळे प्रत्येक स्त्रीने या कॅन्सर बाबत जागरूक राहणे



आवश्यक आहे. या कॅन्सरचे निदान हे अतिशय सोप्या पद्धतीने होऊ शकते. एक सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे कुठलाही कॅन्सर जर त्याच्या पहिल्या स्टेजमध्ये लक्षात आला तर पूर्णपणे बरा होऊ शकतो. या कॅन्सरच्या तपासणीसाठी तुम्हाला डॉक्टर कडे जाऊन PAP SMEAR नावाची तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

ही तपासणी करताना डॉक्टर तुमचे गर्भाशय मुख तपासतील आणि पांढऱ्या पाण्याची तपासणी घेतील. या तपासणीचा खर्च अतिशय कमी किंवा नाममात्र 400 ते 500 रुपये असतो. शिवाय ही तपासणी सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये अगदी मोफत केली जाते. स्त्री रोग तज्ञ डॉक्टर व संस्थांद्वारे PAP SMEAR चे शिबिर देखील घेतले जातात.

जर तुमच्या गर्भाशय मुखात डॉक्टरांना काही ॲबनॉर्मल आढळले तर डॉक्टर तुम्हाला colposcopy या तपासणीसाठी पाठवतील. ही तपासणी करताना इजा होत नाही किंवा दुखतही नाही.

यातील एक महत्वाची बाब म्हणजे PAP SMEAR किंवा COLPOSCOPY या टेस्ट ने गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे निदान हे कॅन्सर होण्याच्या पाच वर्षा आधी सुद्धा लक्षात येते.

त्यामुळे प्रत्येक स्त्रीने वर्षातून एकदा डॉक्टरांकडे जाऊन PAP SMEAR ची तपासणी करून घ्यावी. याबाबत डॉक्टर पल्लवी ईंगळे अस सुचवितात की प्रत्येक स्त्रीने जर तिचा वाढदिवस ज्या महिन्यात येतो त्या महिन्यात या टेस्ट आवर्जून करून घ्याव्यात म्हणजे म विसरायलाही होत नाही आणि पुढे त्याची सवय होते. जी आपल्याच आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त ठरेल.

या कॅन्सर बाबतची गुड न्यूज म्हणजे या कॅन्सरच्या प्रतिबंधासाठी लस उपलब्ध आहे. ही लस नऊ ते 45 वर्षे या वयोगटात घेता येते . पंधरा वर्षाच्या आधी लस घेतल्यास तिचे फक्त दोन डोस घ्यावे लागतात. तर, पंधरा वर्षानंतर लसीचे तीन डोस घ्यावे लागतील. या लसीमुळे स्त्रीचे या कॅन्सर पासून 99.9% संरक्षण होऊ शकते. आतापर्यंत ही लस भारतात तयार होत नव्हती. परंतु आता सिरम इन्स्टिट्यूट पुणे त्यांनी पूर्णपणे भारतीय लस विकसित केली आहे. जी किंमतीतही अगदी स्वस्त आहे. या लसीबाबत जनजागृती केली जात आहे. तुम्ही या लसीसाठी तुमच्या डॉक्टरांना विचारू शकता. ही लस आपल्या सरकारी लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट करून घेण्यासाठी स्त्रीरोग तज्ञ संघटना प्रयत्न करत आहेत.तरी आपल्या सर्व मुलींना ही लस टोचून घ्यावी. खरंतर सर्व शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना याची माहीती देऊन ही लस शाळा महाविद्यालयातच देण्यात यावी असेही मत आता स्त्री रोग तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. वेगवेगळ्या पातळ्यांवर अनेक स्त्री रोग तज्ज्ञ या स्वतः शिबीर घेऊन याची अंमलबजावणी देखील करीत आहेत अशी माहीती डॉ. ईंगळे देतात. त्याचप्रमाणे मासिक पाळी दरम्यान स्वच्छता ठेवणे यावर भर देण्यात यावा. वारंवार होणाऱ्या गर्भधारणा टाळण्यासाठी गर्भनिरोधक साधनांचा उपयोग करण्यात यावा. त्याचप्रमाणे कमी वयात होणारे लैंगिक संबंध टाळावे . एकापेक्षा जास्त जोडीदार नसावे. अशा काही गोष्टी आपण पाळल्या तर या आजारापासून आपण दूर राहू शकतो जर हा कॅन्सर आपणास झाला तर घाबरून न जाता त्यावर रेडिओथेरपी शस्त्रक्रिया व किमोथेरपी घेऊन या कॅन्सरवर उपाय करता येतात. पण हा कॅन्सर होऊच नये यासाठी वर सांगितलेल्या गोष्टींचे पालन करणे अगदी सोपे आहे. शिवाय ते आपल्या हातात आहे. रेडिओथेरपी व किमोथेरपी विदर्भात नागपूर व सेवाग्राम या ठिकाणी केली जाते.

एक स्त्री आजारी पडली तर तिच्या कुटुंबाची घडीच पुर्ण विस्कळीत होते. तरी प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे व त्याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रत्येक स्त्रीने वर्षातून एकदा PAPSMEAR ची तपासणी करून घ्यावी व सर्वाइकल कॅन्सर विरोधातील लस आपल्या मुलींना टोचून घ्यावी.

महिलांमध्ये आढळून येणारा दुसरा आजार म्हणजे स्तनांचा कॅन्सर अर्थात ब्रेस्ट कॅन्सर. आज जागतिक स्तरावर ब्रेस्ट कॅन्सर हा नंबर एक चा कॅन्सर म्हणून ओळखला जातो. शिवाय जगात स्त्रीयांचे सगळ्यात जास्त मृत्यू हे स्तनाच्या कॅन्सर मुळे होत आहेत. याच प्रमाण वय वर्ष 30 ते 65 मध्ये आढळून येतं. परंतू , आता हे प्रमाण कमी वयातही आढळून येत आहे.

वास्तविक पाहता स्त्रीयांना स्वतःच हा कॅन्सर लक्षात येऊ शकतो. सेल्फ ब्रेस्ट एक्झामिनेशन च्या माध्यमातून हे लक्षात येतं. स्तनांचा आकार , फोड , जखम , गाठ , स्त्राव अस काहीही जाणवत



डॉक्टर पल्लवी इंगळे ,
सुविख्यात स्त्रीरोग तज्ञ, चंद्रपूर

असेल तर स्त्रियांनी टाळाटाळ न करता लगेच डॉक्टर कडे जायला हवं . शिवाय अनुवंशिकतेनेही हा कॅन्सर होण्याचं प्रमाण आहे. आपल्या कुटुंबात अशी काही अनुवंशीकता असल्यास आपण थोडं सजग राहून यावर मात करू शकतो. स्तनपानाशी देखील हा आजार निगडीत आहे. याचीही काळजी मातांनी घ्यायला हवी. समजा आपल्याला स्तनाचा कॅन्सर झालाय हे कळले तर मात्र खचून न जाता वेगवेगळ्या टप्प्यांवर याचे औषधोपचार उपलब्ध आहेत. सर्जरी, केमोथेरपी, रेडिओ थेरपी च्या माध्यमातून यावर नियंत्रण मिळवता येऊ शकतं. मॅमोग्राफी ज्याला आपण स्तनांचा एक्स रे सुद्धा म्हणू शकतो हा देखील एक निदानाचा पर्याय आहे. सर्वच कॅन्सर हॉस्पिटल मधे यावर औषधोपचार उपलब्ध आहेतच.

परंतू सगळ्यात महत्वाचे म्हणजे याबाबत आपण जागरूक राहणे , सजग राहाणे , व नियमित स्वच्छता हे महत्वाचे आहे. महिलांमधील वाढत चाललेले ब्रेस्ट कॅन्सर व सर्वाइकल कॅन्सर याबाबत आज आपण जाणून घेतले. दैनिक आधुनिक केसरी च्या वाचकांपर्यंत हा विषय व याच संदर्भातील आणखीही काही महत्त्वपूर्ण अशा आजारावर तज्ज्ञ डॉक्टर कडून जाणून ती माहीती आपणापर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोतच.

शाम हेडाऊ, धनंजय साखरकर, चंद्रपूर

# खंडोबाची कऱ्हा नदी झाली कोरडी



महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा नगरीतील प्रसिद्ध खंडोबाची कऱ्हानदी पावसाअभावी कोरडी पडली आहे. यामुळे पाणी टंचाईच्या संकटाला ग्रामस्थांसह परिसरातील गावांना तोंड द्यावे लागणार आहे. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

## पंकजा मुंडेंनी घेतले घृष्णेश्वराचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** माजी ग्रामविकास मंत्री तथा भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव सौ.पंकजाताई मुंडे आज शिवपरिक्रमा यात्रेनिमित्त श्री घृष्णेश्वर मंदिर येथे दर्शन व अभिषेक करण्यात आला. याप्रसंगी भारतीय जनता पार्टी- रत्नपुर-खुलताबादच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी प्रवीण दादा घुगे, जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतिश दांडेकर, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, युवराज ठेंगडे, नगरसेवक परसराम बारगळ, विकास कापसे,संदिप निकम, राहुल निकुंभ, सुखदेव ठेंगडे, गणेश हजारी, प्रभाकर थोरात, अनिल करपे, किरण बोडखे,राजेंद्र राठोड, रावसाहेब देशमुख, भगवान जातोडे, विलास काळे, संतोष घुसिंगे आदींसह तालुक्यातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते. या शिवपरिक्रमा यात्रेतील सर्व यात्रेतील पदाधिकाऱ्यांचे भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यांनी आभार व्यक्त केले.





## उमरी तालुका अध्यक्षपदी गंगाधर गायकवाड

### उमरी येथे लोकस्वराज्य आंदोलनाची बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**उमरी :** गेल्या अनेक वर्षापासून लोकस्वराज्य आंदोलन या आक्रमक व ईमानदार अशी ओळख असलेली सामाजिक संघटनेत अतिशय निष्ठेने इमानदारीने, कष्टाने स्वतःच्या बळावर आणि संघटनेच्या ध्येय धोरणानुसार एका निष्ठेने ऊन, वारा,पाऊस याची तमा न बाळगता, एका गरीब कुटुंबातील सच्चा कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर उतरून प्रस्थापित उमरी तालुका असो की,नांदेड जिल्हातील ईतर राजकारणी,अन्याय करणार्यां विरोधात आणि समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार विरोधात लढणारा तसेच संयमी, तरुण म्हणून संपूर्ण उमरी तालुक्याला नव्हे तर नांदेड जिल्ह्यात ओळख असलेला युवक म्हणून त्यांची नोंद आंदोलनाकडे असलेला,मा. श्री गंगाधर लक्ष्मणराव गायकवाड निमटेककर यांची सर्वानुमती, बिनविरोध उमरी तालुका अध्यक्षपदी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते एका बैठकीतून दिनांक ०३ सप्टेंबर२०२३ रोजी उमरी येथे सर्वांच्या साक्षीने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक/ अध्यक्ष प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर नांदेड यांना अभिप्रेत असणारी आणि महामानवाच्या विचारावर सतत संघर्ष करुन चालणारे संघटन बांधण्यासाठी व या बांधणीतून संघटनेला बळकटी देण्यासाठी तालुक्यात व शहरात संघटन आणखी मजबूत करण्यासाठी संघटनेचे ध्येय धोरणे ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य समाजातील समाज बांधव, महिला, पुरुष, युवक, युवतीपर्यंत पोचण्याकरिता या पदाची निवड केली असल्याचे, यावेळी वरिष्ठांनी आपल्या मनोगतातून भावना व्यक्त केल्याआहेत. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा जेष्ठ नेते व्हि.जी. डोईवाड धर्माबाद, कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा मार्गदर्शक रावसाहेबदादा पवार नायगाव बा., नांदेड जिल्हा महासचिव कैलास सूर्यवंशी उमरी, हिमायतनगर तालुकाध्यक्ष धोंडोपंत बनसोडे, उमरी युवक तालुकाध्यक्ष राजू गायकवाड मंडाळेकर यांच्या हस्ते उर्वरित तालुका कार्यकारणीच्या पदाधिकार्रांनां आणि विविध आघाड्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी द्वारे नियुक्त्या करून त्यांना लगेच निवडीचे नियुक्ती पत्र प्रधान करण्यातआले आहे. यावेळी तालुक्यातील तालुका उपाध्यक्ष साहेबराव गव्हारकर, राजु गायकवाड, भास्कर वाघमारे, राजू झुंजारे, माधव गायकवाड, चंद्रकांत चव्हाण, पांडुरंग झिंजोरे, रामदास हैबतकर, शिवानंद गाडेकर, श्रीनिवास झुंजारे, सचिन बैलके, श्रावण गायकवाड, रंजीत गायकवाड, गणेश वाघमारे या सह अनेक तरुणांच्या विविध आघाड्यांवर नियुक्ता करण्यात आल्या आहेत.

या बैठकीला तालुक्यातील अनेक तरुणांची आवर्जून उपस्थिती होती.तालुका कार्यकारणीमध्ये निवड झालेल्या नुतन तालुकाध्यक्षसह ईतर पदाधिकाऱ्यांना तालुक्यातील व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी,मित्र परिवाराकडुन, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना भावी पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पैठणमध्ये रंगणार दहीहंडीचा थरार; बक्षिसे जिंकण्यासाठी गोविंदांमध्ये स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गोपाळकाला दोन दिवसांवर आला असून यंदा प्रारब्ध फाऊंडेशनच्या वतीने दहिहंडीची उत्सुकता वाढली आसुन यंदा हजारोची बक्षिसे ठेवल्याने गोविंदा पथकाची कसोटी बघायला मिळणार आहे. प्रारब्धची दहीहंडी फोडण्यासाठी दर वर्षी सात गोविंदा पथके आपली सलामी देत सहा थराची दहीहंडी फोडुन आनंद साजरा करतात. यासाठी दरवर्षी आयोजकांकडून हजारो रुपयांच्या बक्षिसांची लयलूट केली जात असल्याने अनेक गोविंदा पथके दहीहंडी फोडण्यासाठी पैठण शहरात धाव घेतात. अनेक कलाकार, नेतेमंडळी हजेरी लावत असल्याने पैठणच्या प्रारब्धची दहीहंडी उत्सव पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होते. यंदाही या दहिहंडीचे १२ सप्टेंबर मंगळवारी सायंकाळी प्रारब्धच्या आयोजकांकडून दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष शिवराज पारिख यांनी सांगितले असून सर्वत्र उत्सवाची तयारी जोरात चालू आहे.

## वीज बिल भरण्यासाठी सुविधा नसल्याने गैरसोयी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद) येथे राज्य वीज वितरण कंपनीचे मुख्य कार्यालय असून त्यात 24 गावांचा समावेश आहे. त्यामुळे हजारोंच्या संख्येने वीज मीटर ग्राहक आहेत मात्र त्या ग्राहकांचे विज बिल देयक भरण्यासाठी सुविधा नसल्याने देयक भरण्याची ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे तालुका कार्यालय येथे विज बिल देयक भरा असे सांगण्यात येत आहे.

तालुका स्थळाचे कार्यालय 25 किलोमीटर अंतरावर आहे. तसेच या मार्गावर बस सेवा देखील उपलब्ध नाही. तालुका असून बस नाही अनेक वर्षापासून वंचित आहेत या कार्यालयात याआधी सायाय्यक अभियंता प्रदीप काळे हे होते त्यांच्या कार्यकाळात हे विज केंद्र विज भरणा देयकात अव्वल स्थान होते. जिल्ह्यात प्रथम पारितोषिक देखील मिळाले. याआधी विज बिल देयक तीन पतसंस्था कार्यालयात जमा व्हायचे सध्या सवलत बंद आहे. त्यामुळे होणारी गैर सोय कायमस्वरूपी दूर करण्यासाठी पूर्वीप्रमाणे पोस्ट विभागाचे उप डाक घर व जिल्हा सहकार बँक शाखा यांना पूर्वीप्रमाणे विज बिल देयक स्वीकारण्याची परवानगी द्यावी जेणेकरून सर्वांच्या सोयीचे होईल, अशी या भागातील वीज वितरण ग्राहकांची मागणी आहे



# वर्ल्ड कपसाठी टीम इंडियाची घोषणा



**अश्विन, धवन आणि चहलला डच्चू :** बीसीसीआयने वर्ल्ड कपसाठी अनुभवी फिरकीपटू आर अश्विन, ओपनर शिखर धवन आणि कुलचा जोडीतील 'चा' म्हणजे युझवेंद्र चहल या तिघांचा विचार केलेला नाही. वर्ल्ड कपसाठी कुणालाही दारं बंद नाहीत, असं कॅप्टन रोहितने आशिया कपसाठी भारतीय संघाची घोषणा करताना पत्रकार परिषदेत म्हटलं होतं. मात्र त्यानंतरही निवड समितीने या तिघांपैकी एकाचाही विचार केलेला नाही.

**वर्ल्ड कप 2023 आणि टीम इंडिया :** वर्ल्ड कप 2023 चं भारतात आयोजन करण्यात आलं आहे. स्पर्धेत एकूण 10 संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक टीम इतर 9 संघांविरुद्ध प्रत्येकी 1 सामना खेळेल. एकूण 10 ठिकाणी 45 दिवसात 48 सामने पार पडणार आहेत. वर्ल्ड कपला 5 ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. टीम इंडिया वर्ल्ड कप मोहिमेची सुरुवात ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्याने करणार आहे. हा सामना 8 ऑक्टोबरला चेन्नईत पार पडणार आहे.

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बीसीसीआय निवड समितीने आगामी आयसीसी वनडे वर्ल्ड कप 2023 साठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. बीसीसीआयने वर्ल्ड कपसाठी मुख्य संघात 15 खेळाडूंचा समावेश केला आहे. रोहित शर्मा वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचं नेतृत्व करणार आहे. टीम इंडिया श्रीलंकेत आशिया कप 2023 स्पर्धा खेळत आहे. श्रीलंकेत बीसीसीआय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि कॅप्टन रोहित शर्मा यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर आगरकर आणि रोहित या दोघांची पत्रकार परिषद पार पडली. आगरकर यांनी या पत्रकार परिषदेत वर्ल्ड कपसाठी भारतीय संघाची घोषणा केली.

बीसीसीआय निवड समितीने आशिया कपच्या 17 खेळाडूंमधून वर्ल्ड कपसाठी 15 जणांची निवड केली आहे. प्रसिध कृष्णा आणि तिलक वर्मा या दोघांना डच्चू देण्यात आला आहे. तर संजू सॅमसन याचा आशिया कप 2023 मध्ये टीम इंडियात राखीव विकेटकीपर म्हणून समावेश करण्यात आला होता. मात्र प्रसिध कृष्णा आणि तिलक वर्मा या दोघांना वर्ल्ड कपमधून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. वर्ल्ड कपसाठी 5 बॅट्समन, 2 विकेटकीपर बॅट्समन, 4 ऑलराउंडर, 1 रिस्ट स्पिनर आणि 3 फास्ट बॉलर अशी सर्वसमावेशक टीम इंडिया आहे. रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांच्याकडे ओपनिंगची जबाबदारी असणार आहे. विराट कोहली, श्रेयस अय्यर, सूर्यकुमार यादव या तिघांवर मिडल ऑर्डरची जबाबदारी असेल. ईशान किशन आणि केएल राहुल हे विकेटकीपर बॅट्समन आहेत. तर हार्दिक पंड्या, शार्दुल ठाकुर, अक्षर पटेल आणि रविंद्र जडेजा या 4 ऑलरांउडर्सवर बॉलिंग आणि बॅटिंग अशी दुहेरी जबाबदारी असणार आहे. मोहम्मद सिराज, मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराह या तिघांकडे वेगवान बॉलिंगची धुरा देण्यात आलीय. तर चायनामॅन कुलदीप याच्यावर फिरकीची जबाबदारी आहे. तर टीम इंडिया वर्ल्ड कपमधील साखळी फेरीतील अखेरचा सामना खेळणार आहे. टीम इंडियासमोर रविवारी 12 नोव्हेंबर रोजी नेदरलँडचं आव्हान असेल, तो सामना बंगळुरुत पार पडणार आहे. तर त्यानंतर 15 आणि 16 नोव्हेंबरला पहिला आणि दुसरा सेमी फायनल सामना होईल. तर 17 नोव्हेंबरला महाअंतिम सामना होईल.

वर्ल्ड कपसाठी टीम इंडिया | रोहित शर्मा (कॅप्टन), हार्दिक पंड्या (उपकर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ईशान किशन, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, रविंद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकुर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादव.

# किरण डोंगरदिवे यांना राज्यस्तरीय सप्तर्षी साहित्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** मंगळवेढे येथील सप्तर्षी प्रकाशन संस्थेच्या



वतीने मातोश्री काशीबाई घुले साहित्य पुरस्कारासाठी विविध साहित्य प्रकारातील साहित्य मागणी केली होते. त्यास राज्यातील साहित्यिकांनी भर-भरून प्रतिसाद देत २५० हून अधिक साहित्यकृती पाठवल्या. मान्यवर समिक्षकांकडून साहित्यकृती गुणांकन/ अवलोकनाअंती स्पर्धेतील पुरस्कार प्राप्त साहित्यिक घोषित करण्यात आले असून. राज्यस्तरावरील मराठीतील कथा, कविता, कादंबरी आदी विविध साहित्यकृतींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. ह्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी मेहकर येथील साहित्यिक किरण शिवहर डोंगरदिवे ह्यांच्या "माणसं वाचलेली भेटलेली" ह्या व्यक्तिचित्रण संग्रहाची निवड करण्यात आली आहे.किरण डोंगरदिवे हे काव्य, ललित, समीक्षण अश्या विविध साहित्य प्रकारातील लिखाणासाठी ओळखले जातात. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि रोख रक्कम असून लवकरच हे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते वितरित केले जातील असे सप्तर्षी प्रकाशन, मंगळवेढा जि. सोलापूर ह्यांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# जिंतूर कडकडीत बंद; राज्य सरकारची अंत्ययात्रा काढून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटे येथे मराठा समाजाचा विविध मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या महिला पुरुषांवर अमानुष लाठी हल्ल्याचा निषेधार्त व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण व इतर मागण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक 5 सप्टेंबर रोजी जिंतूर बंदची हाक देण्यात आली होती यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने राज्य सरकारची अंत्ययात्रा काढून भव्य मोर्चा काढण्यात आला होता यावेळी घोषणांनी शहर दुमदुमून गेले होते.



मागील काही दिवसांपासून मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी विविध ठिकाणी जनआंदोलन चालू आहेत मात्र राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी चालढकल करत आहे परिणामी सरकारच्या विरोधात जण आक्रोश वाढत चालला त्यातच जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटे येथे लोकशाही मार्गाने उपोषण करणाऱ्या महिला पुरुषांवर पोलिसांनी लाठीहल्ला करून आंदोलन चिरडण्याचे काम करत असल्यामुळे मराठा समाजात तीव्र भावना निर्माण झाल्या आहेत म्हणून सर्वत्र ठिकठिकाणी रास्तारोको, शहरबंद, उपोषण याच्या माध्यमातून आक्रोश मांडत आहेत म्हणून जिंतूर येथील सकल मराठा समाजाच्या वतीने समाजाच्या मागण्यासाठी शहर कडकडीत बंद ठेऊन भव्य मोर्चा काढला शिवाय मोर्च्यात राज्य सरकारची तिरडी वरून अंत्ययात्रा काढली मोर्चात हजारोच्या संख्येने मराठा समाज रस्त्यावर उतरल्याने घोषणांनी शहर दुमदुमून गेले होते. यावेळी मोर्चा तहसील कार्यलयात मागण्यांचे निवेदन देऊन समारोप करण्यात आला आजच्या बंद ला व्यापाऱ्यांनी पाठिंबा दिल्यामुळे 100 टक्के बंद यशस्वी झाला मोर्चात तालुक्यातील हजारो तरुण सामील झाले होते दरम्यान पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



# ओबीसींचे प्रलंबित प्रश्न सोडवा

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर:** 4 सप्टेंबर 2023 रोजीराज्यभरात ओबीसी, व्हिजे, एनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी 72 वस्तीगृह सुरू करणे स्वाधारच्या धरतीवर आधार योजना राबविणे आणि परदेशी शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची संख्या 75 करणे, हे विद्यार्थ्यांचे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत.

या तिन्ही योजना येत्या 11 सप्टेंबर पर्यंत सुरू न झाल्यास12 सप्टेंबरला भिकारी असलेल्या सरकारच्या विरोधात राज्यभरात भीक मागो आंदोलन केले जाईल आणि आणि यातून जमा होणारी निधी राज्य सरकारच्या वित्त विभागाला मनी ऑर्डर द्वारे पाठवल्या जाईल, असा इशारा ओबीसी, व्हिजे, एनटी, एसबीसी ओबीसी समन्वय समिती, बल्लारपूरव्दारे नायब तहसीलदार सतीशजी साळवे बल्लारपूर यांच्या। मा.मुख्यमंत्री अर्थमंत्री इतर मागास बहुजन कल्याण मंत्री EACH सचिव ईतर मागास बहुजन कल्याण विभाग व वित्त विभाग यांना निवेदनाद्वारे देण्यात आले. निवेदन देताना सुधीर कोरडे, शंकर काळे, उमेश कडू, विवेक खुटेमाटे, केशव थिपे, अमोल काकडे, रणजीत धोटे, आकाश दुर्गे, मनोज देरकर, बादल भाऊ ऊराडे, भास्कर वडस्कर, उमेश शेंडे, पराग जांभुळकर ह ओबीसी समन्वय समिती पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांकडून वाहतूक नियमांची जनजागृती मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर महामार्ग पोलीस केंद्रांचे सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हि.एस.जाधव तसेच पोलीस आमलदार जिंतूर केंद्रावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. अपर पोलीस संचालक राज्य मुंबई पोलीस अधिक्षक श्रीमती डॉ. जमादार महामार्ग संभाजीनगर विभाग, पोलीस निरीक्षक पठाण नांदेड विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना वाहतूक नियमावली ची माहिती देण्यात आली. यामुळे होणारे अपघातावर अंकुश लागेल, यात वाहन चालकांनी आपली वाहन चालवत असताना महामार्ग वर आपले वाहन लेनमध्येच चालवावे, आपले वाहन धोकादाय परिस्थितीत कोणतीही ठिकाणी थांबू नये, अल्पवयीन व लहान मुलांना तसेच विना लायसन्स वाहन चालविण्यात येऊ नये, मोबाईल फोनचा वापर वाहन चालवताना करु नये, दारू पिऊन वाहन चालवू नये, दुचाकी चालवताना नेहमी हेल्मेटचा वापर करावा, वाहन चालवताना नेहमी वेगमर्यादांचे पालन करावे, वाहन नेहमी ओव्हरटेक करताना उजव्या बाजूनेच करावे, गावांमधील रस्त्याने महामार्गावर येते वेळेस व महामार्ग ओलांडत असताना वाहतूक बघून सुरक्षितपणे रस्ता ओलंडावा, महामार्ग वर विरुद्ध दिशेने वाहन चालू नये वाहन चालवताना वाहतूक चिन्हे पाहून त्याचप्रमाणे वाहन चालवावे, चार चाकी वाहन चालवताना सीट बेल्ट वापरावे, रात्रीच्या वेळी वाहन चालवताना पुरेशी झोप घेऊन प्रवास करावा, त्याचप्रमाणे आपले वाहनांच्या पाठीमागील बाजूस रिफ्लेक्टर लावा, ज्यांचे वाहनावरील प्रलंबित वाहतूक रक्कम आहे त्यांनी ऑनलाईन म. पो. केंद्राशी संपर्क साधून तडजोडी अंती रक्कम भरून घ्यावी.

याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून मृत्युंजय दूत संकल्पनांची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. तसेच स्वर्गीय मा.बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची ही माहिती उपस्थितांना देण्यात आली.

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रबोधन व जनजागृती करण्यात आली यावेळी जिंतूर महामार्ग पोलीस केंद्रांतील सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



# लोकशाही वाचवण्याची लढाई केवळ काँग्रेसची नाही तर सर्वांची : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा खोटे



बोलून सत्तेत आले आहे. सत्तेत येताच मोदी सरकारने घटनामत्क व्यवस्थेची मोडतोड केली. लोकशाही व संविधान धाब्यावर बसवूर मनमानी कारभार सुरु आहे. काँग्रसने ६० वर्षात देशभरात विविध संस्थांचे जाळे उभे करुन विकास सगळीकडे पोहचवला आणि मोदी सरकार त्याच संस्था विकून देश चालवत आहेत. मोदी सरकारच्या हुकुमशाहीतून देश व लोकशाही वाचवण्याची लढाई असून ही लढाई केवळ काँग्रेस पक्षाची नाही तर आपल्या सर्वांची आहे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात जनसंवाद यात्रेदरम्यान नाना पटोले बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मोदी सरकारविरोधात आवाज बुलंद करण्यासाठी ही जनसंवाद यात्रा सुरु करण्यात आली आहे. महागाईने जनतेचे जगणे मुश्कील केले आहे, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे, घर कसे चालवायचे ही चिंता लोकांना सतावत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव उतरलेले असतानाही मोदी सरकार मात्र पेट्रोल, डिझेलच्या किमती कमी करत नाही. राज्यातील येड्याच्या सरकारने वीज महाग केली आहे. शेतीला आठ तासही विज मिळत नाही, या परिस्थितीच्या विरोधात आपल्याला लढायचे आहे. जनसंवाद यात्रेच्या तिसऱ्या दिवशी चंद्रपूर जिल्हा सेवादलाने आयोजित केलेल्या संस्कृतीक कार्यक्रमानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ध्वजारोहण केले. ध्वजारोहणानंतर चंद्रपूर सेवादलाचे अध्यक्ष सुर्यकांत खणके यांनी जनसंवाद यात्रेसाठी ध्वज नाना पटोले यांच्याकडे हस्तांतरित केला. विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी सकाळच्या सत्रात नगर जिल्ह्यातील जनसंवाद यात्रेत सहभाग घेतला व नंतर उत्तर महाराष्ट्रातील जनसंवाद यात्रेच्या तयारीची आढावा बैठक घेतली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यवतमाळ जिल्ह्यातील वडकी, राळेगाव, आर्णी, महागाव येथे जनसंवाद यात्रेत सहभागी होत जनतेला संबोधित केले, यावेळी त्यांच्याबरोबर माजी मंत्री वसंत पुरके, प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोल्हापुरात विधान परिषदेतील गटनेते आ. सतेज बंटी पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली भुदरगड तालुक्यात पदयात्रा काढण्यात आली. पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे पुणे शहरातील जनसंवाद पदयात्रेचा शुभारंभ पर्वती विधानसभा मतदारसंघातून करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश सरचिटणीस अभय छाजेड, माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोणंदच्या विवेक शिवदेकडून मेरूची मोहीम यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गिर्यारोहणात एव्हरेस्ट पेक्षा ही चढाई साठी कठीण असलेले उत्तराखंडमधील गढ़वाल हिमालयात वसलेल्या मेरू शिखरची मोहीम लोणंद ता.खंडाळा येथील विवेक संजय शिवदे या युवक गिर्यारोहकाने त्यांच्या सहकाऱ्या समवेत यशस्वीपणे पूर्ण केली.या मोहिमेतून गिर्यारोहकांकडून माऊंट मेरुवर देशाचा ध्वज फडकविण्यात आला. राष्ट्रध्वजफडकवित देशाबद्दलचा अभिमान व्यक्त करत या क्षणाचा आनंद घेण्यात आला.या मोहिमेबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

विवेक शिवदे हे लोणंद येथील प्रसिद्ध डॉक्टर व सावित्री हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.संजय शिवदे यांचे चिरंजीव होत. मुलाच्या या मोहिमेबद्दल डॉ.संजय शिवदे यांनी विशेष समाधान व्यक्त केलेले आहे. त्यांनी मुलाच्या धाडसाबद्दल तोंडभरून कौतूक केलेले आहे. ही मोहीम अतिशय खडतर असते. माझ्या मुलाने या मोहीमेत सहभागी होत मोठे धाडस दाखविले.या धाडसाबद्दल त्याचे कौतूक वाटते. त्याने व त्याच्या सहकारी मित्रांनी दाखविलेल्या धाडसाचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. असे डॉ.संजय शिवदे यांनी म्हटले आहे.

मेरूच्या दक्षिण शिखरावर चढाई करणारा गिरिप्रेमी आणि 'एनआयएम' हा भारतातील पहिलाच संघ ठरला, तसेच पश्चिम बाजूने मेरू शिखरावर



चढाई करणारा हा जगातील पहिलाच संघ ठरला असल्याचे म्हटल्याने ही मोहीम कौतुकास्पद व अनेक गिरिप्रेमींना महत्वाची बनलेली आहे.ही मोहीम नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनिअरिंगच्या (उत्तरकाशी) सहकार्याने आयोजित करण्यात आली होती.रात्री ठीक दहा वाजता गिर्यारोहकांनी ह्या मोहिमेस सुरुवात केली. पश्चिम बाजूने चढाईसाठी तांत्रिकदृष्ट्या अत्यंत कठीण असलेल्या नैऋत्य धारेने त्यांनी सकाळी आठ वाजता शिखरावर चढाई केली. उमेश झिरपे यांच्या नेतृत्वात झालेल्या या मोहिमेत लोणंदच्या विवेक शिवदे सह गणेश मोरे, वरुण भागवत, दावा शेर्पा, फुरंतेनसिंग शेर्पा, सिंग्मा शेर्पा आणि नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनिअरिंगचे वरिष्ठ प्रशिक्षक विनोद गुसाई, त्यांचे सहकारी बिहारी राणा,अजित रावत यांचा समावेश होता. या मोहिमेच्या यशात लाक्पा शेर्पा यांनीही मोलाचा वाटा उचलला. त्यांनी कॅम्प वनवर (५५०० मीटर उंच) थांबून मोहिमेच्या यशासाठी मोलाचा हातभार लावला. एनआयएम चे प्राचार्य कर्नल अंशुमन भदोरिया व उपप्राचार्य डॉ. मेजर देवल वाजपेयी यांच्या सहकार्याने ही मोहीम झाली. मेरू हे शिखर समुद्रसपाटीपासून ६६६० मीटर उंचीवर आहे. थलाई सागर आणि शिवलिंग या पर्वतामध्ये माउंट मेरू विराजमान आहे.

याच वर्षी मे महिन्यात माउंट मेरू मोहीम हाती घेण्यात आली होती. परंतु त्यावेळी ती मोहीम पूर्ण करता आली नव्हती माघार घ्यावी लागली होती.शिखराच्या अगदी जवळ जाता आला होते. दोनशे मीटर वरच शिखरमाथा होता.लहरी आणि खराब हवामानामुळे त्यांना माघारी घेत परतावे लागले होते.अपूर्ण राहिलेल्या या मोहिमेला आज या गिर्यारोहकांनी जिद्दीने पूर्ण केल्याने त्यांचे कौतुक होत आहे.

## अय्युब पठाण यांची स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील




विवेकानंद शिक्षण संस्थेतील शाहू विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक अय्युब पठाण लोहगांवकर यांची हिंगोली येथील समृद्धी प्रकाशनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील राज्यस्तरीय स्व. मारोतराव कऱ्हाळे आदर्श पुरस्कार 2023 साठी निवड झाल्याचे पत्र पुरस्काराचे संयोजक प्रा.डॉ. श्रीराम कऱ्हाळे मराठी विभागप्रमुख,शिवाजी महाविद्यालय, हिंगोली यांनी दिले आहे. पुरस्काराचे वितरण ऑक्टोबर महिन्यात होणार आहे. अय्युब पठाण हे विवेकानंद शिक्षण संस्थेत सप्टेंबर 1994 पासून हिंदी- मराठी विषयाचे २९ वर्षापासून अध्यापन करतात त्यांनी बारा पुस्तके लिहिली असून त्यांची "पाणपोई" ही कविता बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या हिंदी- इंग्रजी व सीबीएसई या माध्यमाला अभ्यासक्रमात सध्या समाविष्ठ आहे.त्यांचा" बँन्डमास्टर ते शाळामास्तर व्हाया मराठी साहित्यिक " असा त्यांचा कसरतीचा प्रवास आहे. त्यांना आतापर्यंत पंचेचाळीस राज्यस्तरीय पुरस्कार विविध सेवाभावी संस्था व संघटनेकडून मिळाले आहेत. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक- साहीत्यिक कार्याचा आढावा घेऊन राष्ट्रीय पातळीवरील नामांकित पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.त्यांच्या या यशाबद्दल सर्व शिक्षक मित्रांनी अय्युब पठाण यांचे अभिनंदन केले आहे.

## आयुर्वेद सिटीकडून भव्य शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** समाज निरोगीमय राहिला पाहिजे. त्याच्या विविध आजारांवर निदान करणारी प्रक्रिया घडली पाहिजे. या





विचाराने डॉ.मिलिंद काकडे व डॉ.ज्योती काकडे पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जपत एक महिना सवलतीच्या दरात तपासणी व उपचार करण्याचा निर्णय घेतला आहे. आयुर्वेद सिटीच्या १४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि.६ सप्टेंबर २०२३ ते ५ ऑक्टोंबर २०२३ या एक महिन्याच्या कालावधीत आयुर्वेदिक शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयुर्वेद सिटीचे प्रमुख डॉ.मिलिंद काकडे व डॉ.ज्योती काकडे पाटील यांनी दिली. आयुर्वेद सिटीची आरोग्य सेवा सामान्य माणसांपर्यंत व सर्व घराघरामध्ये पोहचण्यासाठी ह्या शिबिराच्या माध्यमातून प्रयत्न करणार आहोत. मेंदूचे विकार, मणक्यांचे विकार, पॅरालिसिस, मतीमंदत्व, सांध्याचे सर्व विकार, संधीवात, आमवात,पचन विकार, त्वचा विकार, स्त्रीयांचे सर्व विकार,ह् दयरोग, मधुमेह, रक्तदाब, लट्ठपणा, मुळव्याध, मुतखडा, जुनाट सर्दी, दमा, मनोकाविकार, फीट येणे, विस्मरण, कंपवात, कॅन्सर, एडस इ.सर्व विकारांवर सवलतीच्या दरात तपासणी व उपचार केले जाणार आहेत.या शिबिराचा लाभ गरजूनी घ्यावा, असे आवाहन "आयुर्वेद सिटी" परिवारातर्फे करण्यात आले आहे. आयुर्वेद सिटी चांदोबाचा लिंब, लोणंद-फलटण रोड, तरडगांव ता. फलटण,जि.सातारा येथे असून अधिक माहितीसाठी 9561808777 आणि 7744900901 या क्रमांकाशी संपर्क करावा.असे म्हटले आहे



## चारठाणा येथील वीज वितरण कंपनीच्या विविध प्रश्नांसाठी उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील विद्युत महावितरण कंपनीचे ऊपकेंद्र (३३केव्ही सबस्टेशन) आहे. या ऊपकेंद्र अंतर्गत चारठाणासह आजू बाजूच्या ४०खडे पाड्याला विद्युत पुरवठा पुरवला जातो.

चारठाणासह येथील अनेक परीसरातील शेतकऱ्यांची बंद पडलेली सिंगल फेज योजना सुरू करावी, वीज वितरण कंपनीचे येथील बंद केलेले कार्यालय पूर्ववत चालू करावे, अचानक लादलेली जाचकलोड सेटिंग तात्काळ बंद करावी, येथील सर्व विद्युत रोहित्रांची (डीपी) दुरुस्ती करून नवीन किटकॅट व फ्युज बॉक्स बसवावे, सर्व विद्युत तारा बदलण्यात याव्यात तसेच येथे आवश्यक असलेल्या कर्मचारी स्टाफ द्यावा तसेच बाहेरून ये जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुख्यालयीन राहण्याचे आदेश द्यावेत पण गेले महिन्यापासून येथील ऊपकेंद्राचा गलथान कारभाराला वैतागून गेले आहत अशा प्रमुख मागण्यासाठी हे निवेदन दि.४सोमवार रोजी परभणी अधीक्षक अभियंता विद्युत वितरण कार्यालय परभणी यांना दिला आहे या निवेदनाच्या प्रती सहाय्यक अभियंता जिंतूर, कार्यकारी अभियंता परभणी, तहसीलदार जिंतूर, पोलीस स्टेशन चारठाणा यांना देण्यात आले असून या मागणी तात्काळ मान्य न झाल्यास येथील नागरिकांनी अखेर दि. ११सप्टेबर रोजी अमरण उपोषणाचा लेखी इशारा लेखी या निवेदनावर नानासाहेब राऊत, किरण देशमुख, किसनप्रसाद खाडे, प्रभाकर कुर्हे, सरपंच अनिरुध्द चव्हाण, मुस्ताक आहेमद, तहेसिन देशमुख, उदय पांचाळ, गणेश राऊत, वाजेद कुरेशी, शंकर राठोड, एकबाल भाई काजी, बद्रुद्दीन काजी, अबेद देशमुख, भारत खाडे, पुरुषोत्तम चव्हाण, सतीश चव्हाण, कृष्णा सोनटक्के, विलास देशमुख, दौलत देशमुख, राम देशमुख यांच्यासह शेकडो नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

## तांडा कुंडाणेसह बोरी परिसरात विजेचा तुटवडा

### शासन आपल्या दारी व शेतकरी राम भरोसे

आधुनिक केसरी न्यूज

गेल्या महिन्याभरापासून परिसरात पाऊसच नाही पिकी करपत आहेत शेतकरी दिवस रात्र करून पिके जगण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यातच विजेचा लंब डाव सुरू झालं नाही पिकला पाणी भरण्यास मोठे अडचणींचा सामना करावा लागत आहेत त्यात वीज कंपनी शेतकऱ्यांना पुरेसा बीजपुरवठा करत नाही.

**धुळे :** तालुक्यात गेल्या पंचवीस दिवसापासून पावसाने दडी मारली असून, पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरु आहे. मात्र दुष्काळात तेरावा महिना म्हणावा तशी गत शेतकऱ्यांची झाली आहे. समाधानकारक पाऊस झाला नसल्याने विहीर आणि बोरवेलवरून पाण्याची सोय करून शेती पीक जगवत आहे. मात्र अपूर्ण होणाऱ्या विद्युत पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना उपलब्ध असलेले पाणीही पिकांना देता येत नाही आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी अवघा आठ तास विद्युत पुरवठा विद्युत वितरण कंपनीकडून केला जात असतो. त्यातही वीज रेगुलर मिळत नसल्याचे चित्र आहे. तालुक्यात सर्वोच्च ग्रामीण भागात अवघा दोन ते चार तास विद्युत पुरवठा विद्युत वितरण कंपनीकडून केला जात आहे. धुळे जिल्ह्यात महिना भरापासून पावसाने पाठ फिरविल्याने एकीकडे



पिकांना धोका वाढला आहे. तळपत्या उन्हामुळे शेतातील पाणी जिरले असून वेळीच पाऊस न पडल्यास मात्र पिके हातून जाण्याची स्थिती आहे. मागील दहा-बारा दिवसांपूर्वी बरसलेल्या पावसामुळे धोक्यात आलेल्या पिकांना जीवदान मिळाले यात शंका नाही. मात्र, एकदा पावसाने दांडी मारली व तीच परिस्थिती निर्माण होत आहे. पावसाने पाठ फिरविल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सध्याचं तापमान ३४ अंशावर आले आहे. परिणामी, शेतातील पाणी आटले असून, पिकांना पाण्याची गरज आहे. आता पाणी मिळाले नाही, तर उन्हामुळे पिके सुकणार, अशी स्थिती आहे. धुळे तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

## प्रशांत डिक्करच्या नाट्यमय पलायनात दोन पोलिसांचा गेला नाहक बळी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगांव (जामोद):** दि.२ जळगाव संग्रामपूर तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने महापुरात अनेक घरे उद्ध्वस्त झाली असून शेतीचे अतोनात नुकसान झाले. पीडित कुटुंबाला तसेच शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी याकरिता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी २८ ऑगस्ट पासून उपविभागीय अधिकारी जळगाव. येथे अन्नत्यागआंदोलन सुरू केले होते. स्वाभिमानीच्या आंदोलनाला ३०ऑगस्ट रोजी महा विकास आघाडीने सुद्धा पाठिंबा देऊन रास्ता रोको आंदोलन केले त्यामुळे प्रशासना समोर मोठे एक आव्हान निर्माण झाले. मात्र ३० ऑगस्टच्या रात्री म्हणजेच ३१जुलै पहाटे



उपोषणकर्ते प्रशांत डिक्कर उपोषण सभा मंडपातून अचानक गायब झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली, दरम्यान प्रशांत डीक्कर यांना वास्तविक कोणीही पळून नेले नसून तेच स्वतःच पळून गेल्याचे वास्तव्य त्यांनी व्हायरल केलेला व्हिडिओ वरून सिद्ध झाले आहे. असे असताना सुद्धा दिनांक ३० ऑगस्ट च्या रात्री अन्नत्याग मंडपामध्ये पहारा देणारे पोलीस नाईक धीरज बस्सी आणि पोलीस कॉन्स्टेबल निवृत्ती झाल्टे यांना कर्तव्यात कसूर केल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिनांक १ सप्टेंबर रोजी निलंबित केले आहे. सदर दोन्हीही पोलीस कर्मचारी हे आपला पहारा देत होते. त्यातच लघुशंकेला जातो हे कारण देऊन डिक्कर निघून गेले. दोन निरपराध पोलीस कर्मचांवर निलंबनाच्या झालेल्या कारवाई विषयी जनमानसात रोष व्यक्त होत असून त्यांच्या प्रती सहानुभूती आहे. घडलेल्या सर्व घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस प्रशासनाने डीक्कर यांचा उजवा हात समजल्या जाणाऱ्या रोशन देशमुख याला चौकशीसाठी ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी करत आहे.

## लामणगाव जिल्हा परिषद शाळेत शिक्षकदिन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लामणगाव येथे आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लामणगाव येथे ५ सप्टेंबर माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती "शिक्षक दिन"म्हणून मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. शालेय अध्यक्ष विष्णू पाटील मालोदे,मुख्याध्यापक बी डी जाधव यांचे हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले,आज शालेय विद्यार्थी हे विषयवार नियोजन



करून आजच्या मुख्याध्यापिका म्हणून कु वैष्णवी किशोर मालोदे,उपमुख्याध्यापिका कु अमृता विठ्ठल मालोदे व इतर शिक्षक म्हणून दिवसभर "स्वयंशासन"दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी अध्यक्ष विष्णू मालोदे,समिती सदस्य भागण काका मालोदे,मुख्याध्यापक बी डी जाधव, डी एम खाडे, विजय भंडारी,मनोज साळुंके, शेख एम आय,संतोष बोबडे व सर्व विदयार्थी उपस्थित होते.

# बालगोपालांची आनंद पर्वणी...दहीहंडी

## दहीहंडीचे विशेष महत्त्व आजही कायम

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** श्रावण महिन्यात वद्य अष्टमी या तिथीला मोठ्या उत्साहात म्हणजे कृष्ण जन्म साजरा केला जातो. या निमित्ताने गोपालकाला अथवा दहीहंडी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याची अनादी कालांपासुन मोठी परंपरा आजही अखंडपणे सुरू आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये तिथीनुसार अनेक धार्मिक उत्सव साजरे करण्याची सांप्रदायिक परंपरा आजही मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. त्यात विशेष म्हणजे भगवान श्रीकृष्ण जन्म उत्सव काळात एक आगळावेगळा उत्सव म्हणजे बालगोपालांच्या आनंदाची पर्वणी म्हणून मानन्यात येणारा दहीहंडी उत्सव . हा उत्सव म्हणजे बालगोपालांच्या आनंदात भर घालणारी एकप्रकारे पर्वणीच असते. दहीहंडी का साजरी केली जाते .यामागे मोठी शास्त्रीय भुमिका सांगण्यात येते. ती अशी.

बालगोपाळ श्रीकृष्णांच्या जन्मानिमित्ताने दहीहंडी मोठ्या धुमधडाक्यात साजरी करतात. श्रीकृष्णाला बालपणी दही, दुध, लोणी याची खुप आवड होती. कृष्णांपासुन दह्या, दुधांचे रक्षण व्हावे यासाठी यशोदा माता दह्यांची हंडी उंच ठिकाणी अथवा शिक्यावर ठेवत असे. पण श्रीकृष्ण तिथंपर्यत आपल्या नटखट खोड्याच्या



रूपाने यशस्वी पोहचत असत. यासाठी त्याचे संगडीमित्र परिवार, बालगोपाळ त्यांना मदत करीत असतं. या गोष्टीची आठवण म्हणून आजही सर्वत्र दहीहंडीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. दहीहंडीच्या वेळी तरुण एक संघ तयार करून त्यात सहभागी होतात. विविध मंडळे या उत्सवादरम्यान उंचीवर दह्याने भरलेली हंडी लावतात. ही हंडी तरूणांची विविध मंडळे आपल्या परी फोडण्यांचा प्रयत्न करतात. हा एक प्रकारचा खेळ मानला जातो. त्यात मोठ्या प्रमाणावर बक्षिसे ही दिली जातात. यावेळी गोविंदा आला रे आला ! च्या एकस्वरात घोषणा दिल्या जात असल्याने आजुबाजुचा परिसर दुमदुमून जातो. भारतांमध्ये विविध ठिकाणी वेगवेगळ्या धार्मिक परंपरेनुसार दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येतो.

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी दहीहंडीचे आयोजन केले जाते. या दिवशी मातीच्या मडक्यात दही, लोणी, मिठाई, फळे इ.भरून एका उंच ठिकाणी हे मडके टांगले जाते. हंडी फोडण्यासाठी विविध तरुण मंडळे प्रयत्न करतात. दहीहंडी फोडण्यासाठी विविध मंडळातील तरुण एक दुसऱ्याच्या पाठीवर चढून मानवी मनोरा तयार करतात. या मनोऱ्याच्या सर्वात वरच्या थरावर असतो त्याला गोविंदा म्हणतात. तो सर्व थर पार करत आपला तोल सांभाळत ही हंडी फोडतो. हंडी फोडणाऱ्या मंडळाना विविध भेटवस्तु देऊन गौरविण्यात येते. मुलांप्रमाणेच मुली देखील धाडस दाखवून थरांवर थर लावून हंडी फोडतात. श्रीकृष्णाने काजमंडळात गायी चारताना स्वतःची व सवंगड्याच्या घरून आणलेल्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्यपदार्थांचा काला करून सर्वांसह भक्षण करत असे. या कथेला अनुसरून पुढे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा प्रचलित झाली आहे.

**दहीहंडीचे आध्यात्मिक महत्त्व :** गोपालकाला म्हणजे पांढऱ्या रंगाच्या पाच रसात्मक स्वादांचा जास्तीतजास्त प्रमाणात निर्गुण चैतन्याशी संबंध दर्शवणारा व पुर्णावतारी कृष्णकार्यांचे दर्शक असलेला समुच्चय काला हा शब्द एकसंघ व वेगात सातत्य असणाऱ्या क्रियेशी संबंधित आहे . काला म्हणजे त्या काळात त्या स्थळाला त्या त्या स्तरावर आवश्यक असे वैशिष्ट्यपूर्ण कार्य दर्शवणा–या घटनांचे एकत्रीकरण पुर्णावतारी कार्य हे स्थळ, काळ,व स्तर या तीनही घटकांवर आदर्शवत असे असते . या कार्यप्रक्रियेत विविधांगी जीवनाचे पैलु आध्यात्मिकरित्या ईश्वरी नियोजनाव्दारे मानवजातीसमोर लीलया उलगडून दाखवले जातात . गोपालकाला हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पुर्णावतारी कार्याचे प्रतिनिधी स्वरूप म्हणजे दहीहंडी उत्सव होय .

**दहीहंडीतील प्रमुख घटक :** दही, पोहे, लाही, दुध, ताक व लोणी हे दहीहंडीतील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहे .

**दही** :–वात्सल्यभावांतुन प्रसंगी शिक्षा करणाऱ्या मातृभक्तीचे प्रतीक .

**पोहे** :– वस्तुनिष्ठ गोपभक्तीचे प्रतीक भगवान श्रीकृष्णाला एकनिष्ठ मानुन साथ देणारे प्रतीक .

**दुध** :–गोपीच्या सहज सगुण मधुराभक्तीचे प्रतीक .

**ताक** :–गोपींच्या विरोधभक्तीचे प्रतीक .

**लोणी** :–सर्वांच्या श्रीकृष्णांवरील अवीट प्रेमाच्या निर्गुणभक्तीचे प्रतीक या दिवशी ब्रम्हांडात कृष्णतत्वाच्या आपतत्वात्मक प्रगती गतिमान लहरींचे आगमन होते . काल्यातील पदार्थ या लहरी ग्रहण करण्यात अग्रेसर असतात .



# यंदाही दहीहंडीचा उत्सव रंगणार

## सिद्धार्थ व संघशक्ती मित्र मंडळाचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सुयोग्य नियोजन, अनेक आकर्षक बक्षिसांची रेलचेल, नयनरम्य विद्युत रोषणाई, गोविंदा पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सुसंस्कृत म्हणून संपूर्ण धुळे शहरात प्रसिद्ध असलेल्या देवपूर परिसरातील सिध्दार्थ नवयुवक मित्र मंडळ आणि संघशक्ती मित्र मंडळाची मानाची दहीहंडी उत्सव समितीची सन-2023 ची कार्यकारिणी ॲड. विशाल साळवे, रावसाहेब विक्रांत साळवे, हर्षल महाले, विवेक नेतकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या एका बैठकीत एकमताने अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवडण्यात आली. यावर्षीच्या दहीहंडी उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विशाल मोरे तर उपाध्यक्षपदी गणेश धनगर आणि खजिनदार पदी वैभव माळी यांची एकमताने निवड करण्यात आली. सिध्दार्थ मित्र मंडळ व संघशक्ती मित्र मंडळच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही येत्या 7 सप्टेंबर रोजी धुळे शहरातील आंबेडकर लॉ कॉलेज देवपूर धुळे येथे दहीहंडी उत्सव अत्यंत शिस्तबद्ध व जल्लोषमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या दहीहंडी उत्सवाच्या नियोजनासाठी दोन्ही मंडळाच्या युवा कार्यकर्त्यांनी बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या सुरवातीला सूत्रसंचालन सिध्दार्थ वाघ व हितेश महाले यांनी केले. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा शाल देऊन व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. दोन्ही मंडळाच्या कडून नेहमी संकटकाळात जनतेला मदत करण्याबरोबरच विविध उपक्रमांच्या माध्यमातून राजकारणविरहीत सामाजिक कार्य अव्याहतपणे सुरू आहे. जनतेचे खास आकर्षण असलेला दहीहंडी उत्सव हा सुसंस्कृत म्हणून ओळखला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक पद्धतीने हा सोहळा भव्य-दिव्य स्वरुपात, जल्लोषात व खेळीमेळीच्या वातावरणात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाच्या वतीने देण्यात आली. यावेळी सुशील जैन, विवेक नेतकर, सिध्दार्थ वाघ, चेतन अहिरे, नागिंद मोरे, बापू चौधरी, नीरज लाड, जितेंद्र बोरसे, सिध्दार्थ मोरे, राज सोनवणे, गोलू वरांगावकर, शुभम चौबे, राज ठाकुर, प्रीतम रामोशी, राहुल सूर्यवंशी, धम्मापाल बैसाने, प्रशांत पाटोळे, दीपक बोरसे, प्रफ्फुल सोनवणे, गणेश शिंदे, निखिल बोरसे, वैभव माळी, जयेश मिस्तरी, गौरव मिस्तरी, अजय नारेकर, गणेश बर्वे, विशाल कुराळे, यश कांजरेकर, आकाश सुर्यवंशीयावेळी उपस्थित होते.

# नांदा तांडा परिसरात उन्हाने करपू लागलेल्या पिकामुळे शेतकरी झाला हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथील परिसरात सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे व सरपंच वरदानसिंग चव्हाण यांनी दि.३/९/२३ रविवार रोजी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीन, कापूस व मका उन्हाने करपू लागलेल्या या पिकांची पाहणी केली. जून आणि जुलै महिन्यात पुरेसा पाऊस न झाल्याने पेरण्या करण्यास बळीराजा धजावला नाही राज्यातील इतर भागातही जवळपास हीच पाऊसाची परिस्थिती आहे. बळीराजाने पावसाचा अंदाज घेऊन पेरण्यांचे नियोजन केले. हातातोंडाशी आलेल्या माल वाया जात आहे.बळीराजने वरुण राजाची प्रार्थना करूनही वरुण राजा प्रसन्न झाला नाही त्यामुळे बळीराजाची सावळदबारा परिसरात नांदा तांडा देव्हारी टिटवी मोलखेडा घाणेगांव तांडा पिंपळवाडी जामठी रवळा जवळा डाभासह चिंता वाढली आहे. गेल्यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने या काळापर्यंत शेतीची बहुतांशी कामे पूर्ण झाली होती. यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने कपाशी, धान, सोयाबीन, कडधान्ये या सारखी मुख्य पिके धोक्यात आली आहेत. पिकांनी मान टाकल्याने बळीराजाच्या डोळ्यात अश्रूंचा महापूर आला आहे. बळीराजाची नजर आकाशाकडून हटायला तयार नाही. राज्यावर दुष्काळाचे सावट असल्याने बळीराजा चिंतेत आहे.

यावेळी सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला. यावेळी नव्यानेच झालेले सरपंच वरदानसिंग चव्हाण, महा ई सेवा केंदाचे सुनील माकोडे, निखिल टिकारे,पंडीत चव्हाण, आत्माराम चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण यांना केवायसी, आधार कार्ड लिंक व ई पीक पाहणी कशी करायची या संदर्भात शेतकऱ्यांना सखोल अशे मार्गदर्शन तहशिलदार मोहनलाल हरणे यांनी केले.मागच्या वर्षीचे अतीवृष्टीचे बरेच शेतकरी वंचित त्यांना पण आम्ही लवकरच पैसे खात्यावर जमा करु असे सांगितले.

सोयाबिन, कापूस व मका पीक परिस्थितीबाबत व मंडळ अधिकारी एल आर जाधव यांनी पळसखेड टिटवी सावळदबारा डाभा नांदा तांडा घाणेगाव पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली असता पिकाची स्थिती चिंताजनक असल्याचे समजले बरेच पिकांचे व दोन ते तीन दिवसात पाऊस न आल्यास पिकाची स्थिती अजून बिकट होऊ शकते असे सांगितले. बनोटी मंडळ अधिकारी एल आर जाधव, सरपंचपती शिवाआप्पा चोपडे, सरपंचपती भागवत जाधव, पोलिस पाटील ज्ञानेश्वर राठोड, टिटवी, पोलिस पाटील विलास कुल्ले, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, नागरिक व शेतकरी वर्ग उपस्थित होते.

**अशी करा पिकांची नोंद :** ई–पीक पाहणी ॲपवर वापरून पिकांची नोंद करण्यासाठी सगळ्यात आधी तुम्हाला हे ॲप डाऊनलोड करायचं आहे .त्यासाठी प्ले–स्टोअरवर जायचं आहे . तिथं E-PEEK PAHANI असं सर्च करायचं आहे . इथं ई–पीक पाहणीचं व्हर्जन–2 वर क्लिक करायचं आहे . त्यानंतर इन्स्टॉल वर क्लिक करायचं आहे .इस्टॉलेशन कम्प्लिट झालं की ओपन या पर्यायावर क्लिक करायचं आहे .त्यानंतर ई–पीक पाहणी नावाचं पेज तुमच्यासमोर ओपन होईल . याला डावीकडे सरकवल्यास हे ॲप वापरण्यासाठी लागणारी माहिती तिथं दिलेली असेल .त्याकरीता शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करून घ्यावी आता पंधरा दिवसांची मुदत वाढ देण्यात आली आहे .
तहशिलदार मोहनलाल हरणे सोयगाव



# महिलांनी नगरसेवक शेख यांना बांधल्या राख्या

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** लोहा शहरातील हिंदू-मुस्लिम समाजात एकोपा निर्माण करणारे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष नगरसेवक करीम भाई शेख यांचा प्रकर्षाने उल्लेख केला जातो. कोणताही हिंदू मुस्लिम सण असो नगरसेवक करीम शेख अतिशय आनंदाने साजरा करून ऐक्याचा जणू संदेशच देतात. याचाच प्रत्यय काल रक्षाबंधन निमित्त दिसून आला.

रक्षाबंधन निमित्त असंख्य हिंदू महिलांनी आपल्या नगरातील, प्रभागातील भावाला राखी बांधून सण उत्साहात साजरा केला.बहिण भावाचा प्रेमाचा विश्वासाचा सण म्हणून राखी पौर्णिमा महत्त्व भारतीय संस्कृतीमध्ये राखी पौर्णिमा प्रसिद्ध असून या दिनाचे औचित्य साधून लोहा शहरातील नवी आबादी येथील महिलांनी प्रभागाचे लोकप्रिय नगरसेवक करीम भाई शेख यांना राखी पौर्णिमेनिमित्त राखी बांधून हिंदू-मुस्लिम ऐक्य निर्मिती चा जणू संदेशच देत आपल्या भावाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी सौ. रेखाबाई कटवड, सौ. छायाबाई केंदे, सौ.रेश्माबाई जाधव, सौ. संगिताबाई नरवट, श्रीमती विमलताई, श्रीमती सुभाबाई वड, श्रीमती चौत्राबाई सानप, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शिवराज दाढेल लोहेकर, सामाजिक कार्यकर्ते सलिम शेठ रामदास डुबूकवाड, साहिल शेख अजमत शेख आदींची उपस्थिती होती.

# उज्ज्वल पुरस्कारांसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील उज्वल प्रतिष्ठानच्या वतीने 'उज्वल साहित्यरत्न' आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तिंना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी नवोदितांसह सर्व साहित्यिकांना आणि विविध क्षेत्रातील व्यक्तिंना विहित नमुन्यातील प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मराठीतील विविध साहित्यकृतींसाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठीचे आणि इतर पुरस्कारांसाठीचे प्रस्ताव शेवटचा दिनांक ५ ऑक्टोंबर २०२३ पर्यंत उज्वल प्रतिष्ठान कंधार यांच्याकडून स्विकारण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष प्रकाश ढवळे नागलगांवकर यांनी दिली.

साहित्यक्षेत्रातील कथा, कविता, नाटक, वैचारिक, आत्मकथन, कादंबरी, ललित, शैक्षणिक, धार्मिक तथा बालसाहित्य या साहित्यप्रकारांतून एकूण ५ पुरस्कार देऊन साहित्यिकांना गौरविण्यात येणार आहे. तर वैद्यकीय, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, कृषी, सामाजिक तथा सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना ५ पुरस्कार दिले जाणार आहेत. तरी इच्छुकांनी विहित नमुन्यातील प्रस्तावासोबत दोन फोटो, साहित्यिकांसाठी दोन प्रकाशित साहित्यकृती (पुस्तके) 'उज्वल प्रतिष्ठान, प्रकाश नामदेव ढवळे, कुशीनगर, म. बसवेश्वर पुतळ्याजवळ, नवीन कौठा, नांदेड मो. ९७६६२८४८७३ या पत्त्यावर पाठवावेत असे निवड समितीचे प्रमुख प्रज्ञाधर ढवळे यांनी कळविले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# अंतरवाली सराटी लाठीचार्जचा एम.आय.एम.तर्फे निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे २९ ऑगस्टपासून मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी उपोषण सुरु केले होते. आंदोलन सुरु केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांचेशी संपर्क करून उपोषण मागे घेण्याबाबत विनंती केली होती. मात्र त्यांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला. शुक्रवारी प्रकृती खालावल्यामुळे पोलीस मनोज जरांगे यांना उपचारासाठी घेवून जात असतांना आंदोलकांनी विरोध केला.त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला.यावेळी पोलिसांनी हवेत गोळीबार आणि अश्रुधुराचा देखील उपयोग केला. या अमानुष लाठीचार्ज चा जाहीर निषेध धुळे जिल्हा एम.आय. एम.च्यावतीने करण्यात येत आहे.

वरील सर्व घटनाक्रम लक्षात घेता सकृतदर्शनी पोलीस प्रशासनाने गंभीर चुक केल्याचे दिसून येते. मराठा मोर्चाचे कार्यकर्ते दि.२९ ऑगस्ट पासून शांततेने आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करीत असतांना पोलीस प्रशासनाने त्याच दिवशी मोठा फौजफाटा गोळा करून ठेवला आणि अंतरवाली सराटीचा इतर गावांशी संपर्क तोडण्यात आला. यासंदर्भात कार्यकर्त्यांनी विचारणा केली असता मुख्यमंत्री महोदय येणार आहेत अशी खोटी थाप मारण्यात आली.

म्हणजे आंदोलन चिरडण्याची पोलिसांची पुर्वनियोजित योजना होती. याचा सरळ सरळ अर्थ होतो कि जनतेने त्यांच्या न्याय हक्कासाठी शासनाच्या विरोधात आंदोलन करू नये.

महाविकास आघाडीचे सरकार असतांना आमचे सरकार येवू द्या फक्त दोन महिन्यात मराठा आरक्षण देतो असे म्हणणारे भाजपाचे नेते सत्ता हाथात येवून सव्वा वर्ष झाले तरी मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवू शकले नाही.हे अपयश झाकण्यासाठी तर आंदोलन चिरडण्याचा सरकारचा केविलवाणा प्रयत्न नाही ना ? असा सवाल या निवेदनाद्वारे आम्ही करीत आहोत.जालना जिल्ह्यातील एका छोट्याश्या गावात होणाऱ्या आंदोलनासाठी एवढ्या मोठ्याप्रमाणात पोलीस बंदोबस्ताची गरजच का ?भाजपाचे सत्ताधारी कायमच मराठा आरक्षणाबद्दल मराठा समाजाला गाजर दाखवत आलेले आहे.



आणि याचा जाब विचारल्यावर लाठीचार्ज आणि आंदोलकांवर गंभीर गुन्हे दाखल केले जातात. यापूर्वी सुमारे पाच वर्षांपुर्वी नवी मुंबईतील कामोठे येथे मराठा मोर्चा आंदोलकांवर कलम ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यावेळी देखील राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस होते. आता देखील राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीसच आहेत. यानिमित्तानेआंदोलक मराठा तरुणांवर गंभीर गुन्हे दाखल करायचे आणि त्यांना जीवनातून उठवायचे ही संघ-भाजपाची कुटील नीती समोर आलेली आहे. या निवेदनाद्वारे आम्ही मागणी करीत आहोत की तातडीने मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा आणि मराठा आरक्षणाच्या बरोबरीने गेल्या काही वर्षांपासून धनगर आरक्षण आणि मुस्लीम आरक्षणासाठी देखील धनगर आणि मुस्लीम समुदाय संघर्ष करीत आहे. त्यामुळे धनगर आणि मुस्लीम समाजाला आरक्षण द्यावे ही विनंती.



# मोबाईल मेडिकल क्लिनिक व्हॅनचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** 2 सप्टेंबर रोजी कन्नड तालुका शिक्षकांच्या सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात मोबाईल क्लिनिक व्हॅन लोकार्पणसोहळा संपन्न झाला. सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची बँक एस.बी.आय. फौंडेशन च्यावतीने जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी या चार मोबाईल क्लिनिक व्हॅन दिल्या आहेत. या व्हॅनच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवा देण्यात येणार आहे. या मोबाईल क्लिनिक व्हॅनचे लोकार्पण कन्नड शहरामध्ये केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आरोग्य शिबिरही आयोजित करण्यात आले होते अनेक गरजुंनी यावेळी याचा लाभ घेतला.या लोकार्पण सोहळ्यासाठी एस.बी. आय. फौंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक संजय प्रकाश, तसेचअसिस्टंट मॅनेजर राजाराम चव्हाण, विमल गोमासे, तसेच भगवान बाबा समाज विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोपीनाथ वाघ, भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा सरचिटणीस डॉक्टर संजय गव्हाणे, भगवान कोल्हे, डॉक्टर सीताराम जाधव, मिलिंद पाटील, काकासाहेब तायडे, अजय सिंग राजपूत, भगवान दौंड, जिल्हा परिषद सदस्य किशोर आबा पवार,अर्चनाताई पवार, गोपीनाथ वाघ, प्रवीण पवार, डॉक्टर निशा, डॉक्टर जाधव, वैद्यकीय अधीक्षक, डॉक्टर प्रविण पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी धानोरकर, तहसीलदार विद्याचरण कढवकर, गटविकास अधिकारी चंद्रभान ढाकणे, यांच्यासह कन्नड शहरातील अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपेक्षा वाघ यांनी केले. भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते म्हणाले, कन्नड तालुक्यातील वाड्या वस्त्यांवर आरोग्याच्या सुविधा या मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून मिळणार आहेत. यासह रुग्णांना औषधे देखील उपलब्ध करून देण्यात येतील त्यामुळे, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ही मोठी संजीवनीच आहे. डॉ. भागवत कराड यांच्या नेतृत्वाखाली हा सामाजिक प्रकल्प राबविण्यात आला असून, कायमस्वरूपी हा प्रकल्प कन्नड तालुक्यात राबवण्या संदर्भात संजय खंबायते यांनी यावेळी सुचित केले. एस बी आय बँकेला जो काही नफा मिळतो, त्या नफ्यातील काही वाटा एस बी आय फौंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी खर्च केला जात असतो. याच फौंडेशनच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये कन्नड, वैजापूर, गंगापूर आणि खुलताबाद या चार तालुक्यांमध्ये व्हॅनच्या माध्यमातून हे फिरते दवाखाने सुरू करण्यात आली. शिवाय गरिबांसाठी आयुष्यमान भारत अंतर्गत पाच लाख रुपयांचा विमाही मिळणार आहे. कन्नड तालुक्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची मागणी यावेळी करण्यात आली ही मागणीही लवकर पूर्ण करू असे डॉ भागवत कराड यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या आरोग्य मंत्र्यांशी बोलून उपजिल्हा रुग्णालय लवकरच सुरू करण्याचाप्रयत्न करू असे यावेळी त्यांनी सांगितले. ही योजना जम्मु काश्मिर मधील बॉर्डरलेस वर्ल्ड फौंडेशनच्या सहकार्याने सुरु करण्यात आली. यावेळी फौंडेशनचे विश्वस्त नरसिंह लगड, डॉ मनिषा पळसकर, निवृत्त लेफ्टनंट कमांडर दुष्यंत पंडित अष्टेकर, तसेच प्रमुख सल्लागार बाळासाहेब सर्जे, प्रकाश गोरे हेही या कार्यक्रमास उपस्थित होते.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव व सप्ताह सोहळ्याचे आयोजन

## प्रेममूर्ती दिलीपजी महाराज यांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील क्षेत्र सावळदबारा सालाबाद प्रमाणे याही वर्षी देखील कलियुगातील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामी मंदीरावर श्री कृष्ण जन्म अष्टमी महोत्सव निमित्त धार्मिक श्रीकृष्णावर आधारित सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे ही सुरुवात दि १/९/२३ शुक्रवारपासून झाली आहे.

दि.६/९/२३ ला श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्ताने कथा प्रवक्ता कृष्णकृपा प्रेम मूर्ती श्री दिलीपकर जी महाराज वृंदावन धाम जळगावकर यांचे मधुर वाणीतून संगीतमय जाहीर श्री कृष्ण अवतार कथेचा कार्यक्रम दि ६/९/२३ रोजी रात्री आठ वाजता आयोजित करण्यात आला आहे.दुसऱ्या दिवशी दि 7.9.2023 ला सकाळी 9.00 वा ध्वजारोहण होईल १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी चार वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्ताने श्रीकृष्णाची भव्य अशी शोभायात्रा (पालखी) काढण्यात येणार आहे. आणि या कार्यक्रमाची सांगता ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी आठ वाजतासांगता होणार आहे अशी माहीती चक्रधर स्वामी मंदीराचे पुजारी श्री गोपीनाथ काशीनाथ पुजारी व मंडळाचे अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत यांनी दिली आहे. या कालखंडात दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्त यांनी यांनी याचा अमृतवाणी चा लाभ घ्यावा सायकांळी बालगोपाल यांचे चालता बोलता कार्यक्रम होईल. तरी पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने हजर राहून या ज्ञानरुपी किर्तनाचा आनंद घेण्याचे अशे आवाहन पुजारी व ग्रामस्थ करीत आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर